ट्रेक क्षितिज संस्था
स्वप्न दुर्गभ्रमणाचे, आव्हान क्षितिजाचे.
www.TreKshitiZ.com

अंक १ | वर्ष २०२१

# क्षितिजीयन्स
# KSHITIZIANS





## गडसंवर्धनाची दशा आणि दिशा
**डॉ. तेजस गर्गे**
राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे संचालक



## अष्टहजारी शिखरांची सप्तपदी
**उमेश झिरपे**
जेष्ठ गिर्यारोहक, गिरिप्रेमी संस्था



## कावळ्यांचे तत्वज्ञान
**डॉ. राजू कसंबे**
सहाय्यक संचालक (शिक्षण) – BNHS



## INSECTOGRAPHY
**युवराज गुर्जर**
वन्यजीव छायाचित्रकार व अभ्यासक

# लेखानुक्रम




संपादकीय



गडसंवर्धनाची दशा आणि दिशा
– डॉ. तेजस गर्गे.......२



अष्टहजारी शिखरांची सप्तपदी
– उमेश झिरपे.......५



मोहक ईशान्य
– ॐकार धुळप.......८



हिमालयातील नद्या
– वाहते सौंदर्य.......१२



कावळ्यांचे तत्वज्ञान
– डॉ. राजू कसंबे.......१३



INSECTOGRAPHY
– युवराज गुर्जर.......१५



आठवणी राजमाचीच्या
– श्रीरंग वैद्य.......१७



निसर्गाची रंगपंचमी
– फुलपाखरू.......१९



चांदवड टाकसाळ–
एक ऐतिहासिक मागोवा
– मेघन पेटकर.......२०



Unlock Trek 1.0 /
लॉकडाऊन नंतरची भटकंती
– राहुल मेश्राम.......२२



आमचे मामा...
– ऋषिकेश मोटे.......२४



बारवस्थापत्याचा अविष्कार
– पुष्करणी.......२६




मोक्याचा मोहनगड
– चैतन्य सबनीस.......२७



ड्यूक्स नोज ते उंबरखिंड
– श्रेयस पेठे.......२९



जन्म आपल्या हिमालयाचा
– शार्दुल भोगले.......३१



गोंधळ
– नंदु देवधर.......३३



करोना, निसर्ग आणि ट्रेकक्षितिज
– राहुल मेश्राम.......३४

वाटचाल – ट्रेकक्षितिज संस्था
– अमित सामंत.......३७

# संपादकीय

प्रिय वाचक,

चार मराठी माणसं एकत्र आली की एखादी संस्था सुरु होते, हा अगदी जुना परिपाठच आहे. मग त्या संस्थेच्या उद्दीष्ट, धेयानुसार उपक्रम सुरु होतात आणि त्याचाच एक अपरिहार्य भाग असतो तो म्हणजे संस्थेचे एखादे अनियतकालिक सुरु करायचे. विषयाच्या व्याप्तीनुसार हे अनियतकालिक विस्तारत जाते, कधी तरते कधी थांबते.

आपल्या डोंगरवेड्यांच्या विश्वात असे अनेक प्रयोग यापूर्वी झाले आहेत. काहींनी बराच काळ सातत्य टिकवले देखील. 'जिद्द' सारखे त्रैमासिक १९८१ पासून अगदी गेल्या काही वर्षांपर्यंत छापले जात होते. ट्रेकक्षितिज संस्था सुरु झाली तेव्हा देखील वेबसाईटच्या जोडीने एखादे छापील मासिक असावे असा विषय एक-दोनदा पुढे आला आणि काही कारणाने मागे पडला. अर्थात ही अठरा-वीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे.

खरं तर क्षितिज संस्थेचा जन्म झाला तेव्हापासूनचा सातत्य असलेला उपक्रम म्हणजे ट्रेकक्षितिजची वेबसाईट ( www.trekshitiz.com). आपण भटकलेल्या किल्ल्यांची अचूक माहिती मराठी भाषिक वेबसाईटच्या माध्यमातून जगापर्यंत पोहचवणे. अर्थात माहिती देणारे त्यावेळचे आधुनिक माध्यम गेले २० वर्षे संस्थेने अतिशय प्रभावीप्रणे हाताळले आणि आजही हाताळत आहे. मग पुन्हा मासिक कशाला असा प्रश्न कोणालाही पडू शकतो.

गेल्या दहा वर्षात समाज माध्यमांनी आपल्या सर्व जगण्याचाच ताबा घेतला आहे. सर्वत्रच माहितीचा प्रचंड विस्फोट म्हणावे इतकी माहिती समाज माध्यमातून वाहत राहते. काय घ्यावे काय नाही, काय खरे काय खोटे, सत्य किती आणि भाकड किती असे अनेक प्रश्न सतावत राहातात. अशावेळी विश्वासार्ह माहिती देणारे एखादे ई-मॅगझिन का काढू नये असा विचार संस्थेच्या सभासदांनी मांडला.

टाळेबंदीतच ही संकल्पना पुढे आली. सगळेच घरात अडकून पडले होते. डोंगरांचे, किल्ल्यांचे दर्शन तर दुर्मीळच झाले. आठवणींना उजाळा मिळत राहायचा इतकाच काय तो भाग. दुसरीकडे माहितीचा ओघ तर होताच. मग आपणच काही एक संकल्पना घेऊन, दर्जेदार असे काही का देऊ नये याची चाचपणी सुरु झाली. अर्थातच हे नव्या पिढीच्या नव्या माध्यमा प्रमाणेच डिजिटल स्वरुपातच करायचे हे नक्की झाले.

त्यानुसार जुळवाजुळव सुरु झाली. वेगवेगळे विभाग पाडले गेले. त्या-त्या विभागानुसार सभासद विभागले गेले. तरी सगळं मार्गाला लागेपर्यंत टाळेबंदी संपण्याची वेळ आली. काही लेख तज्ज्ञांकडून घ्यायचे, सद्यस्थितीवर भाष्य करणारे काही तरी नक्कीच हवे, डोंगराशी निगडीत सर्वच घटकांना स्पर्श करायचा, स्वतंत्र छायाचित्रं वापरायची आणि जोडीला संस्थेच्या सभासदांचे व संस्थे बरोबर ट्रेकला आलेल्यांचे लेख, कलाकृती तर आहेतच. एकेक करत सारे अखेरीस मार्गी लागले आणि सर्वांच्या प्रयत्नातून मासिकाचा हा पहिला अंक तयार झाला.

नव्या वर्षच्या पहिल्याच दिवशी 'क्षितिजियन्स' आम्ही सर्व डोंगरभटक्यांसाठी आंतरजालावर उपलब्ध करुन देत आहोत. आमच्या या पहिल्याच प्रयत्नाला तुम्ही भरभरुन प्रतिसाद द्याल तसेच प्रेमाने त्याचे स्वागत कराल अशी अपेक्षा आहे. अंका बद्दलची आपली मते, सूचना व सुधारणा आम्हाला अवश्य कळवा. त्याचा आम्हाला पुढील अंक प्रकाशित करतांना नक्कीच फायदा होईल आणि अंक जास्तीत जास्त वाचकाभिमुख व्हायलाही मदत होईल.

राहुल मेश्राम
अध्यक्ष, ट्रेकक्षितिज संस्था




# गडसंवर्धनाची दशा आणि दिशा

**– डॉ. तेजस गर्गे**



महाराष्ट्राच्या मातीत जन्मास आलेल्या प्रत्येकाच्या अंगावर किल्ला या शब्दाने रोमांच उभे राहतात, छत्रपतींच्या नावाने आगळेवेगळे स्फुरण चढते. महाराष्ट्र या प्रादेशिक भुभागाची आगळी वेगळी ओळख या दुर्गांमुळे व या दुर्गांच्या आधारे छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्यामुळेच तयार झालेली आहे. यात गमतीचा भाग म्हणजे ज्या ब्रिटीश साम्राज्याच्या अंकीत असणाऱ्या कंपनी सरकारने हे किल्ले उध्वस्त केले त्या इंग्रज सरकारने नंतरच्या काळात काही किल्ले राष्ट्रीय स्मारक म्हणून जाहीर केले. स्वातंत्र्योत्तर काळात काही निवडक किल्ले राज्य शासनाद्वारा संरक्षित केले गेले आहेत. यातील काही निवडक किल्ल्यांचे संरक्षण व संवर्धन भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणातर्फे झालेले आहे.




महाराष्ट्रातील पश्चिम घाटाच्या भौगोलिक परिस्थितीमुळे वैशिष्ट्यपुर्ण स्थापत्य रचना प्राचीन काळापासुनच महाराष्ट्रात उदयास आली. बौद्धमठांच्या विकासासाठी निर्माण करण्यात आलेली कातळलेणी हा इ.स. सन पुर्व २ ऱ्या शतकापासुन इ.स. १४ व्या शतकापर्यंत व नंतरही सुरु असलेली स्थापत्य घडामोडीची एक लाटच होती. बौध्दांप्रमाणेच हिंदु व जैन पंथीयांसाठी हे खोदकाम होत गेले. कातळलेण्यांबरोबरच जमिनीवर मंदिरेही उभी केली जात असणार याचा निश्चित पुरावा तर तसेच रामटेक येथे बांधुन उभे केलेल्या सातवाहन व वाकाटकातील मंदीरांमध्ये दिसुन येतो. इ.स.१० व्या शतकाच्या पुढे ही मंदीरे डोंगरावरही बांधलेली दिसुन येतात. उदा. हरिश्चंद्रगडावरील मंदिर. अशा प्रकारे नदीकाठावरील मानवी वस्तींपासून दुर डोंगरकपाऱ्यां मधील मानवी वस्ती धार्मिक कारणांनी झालेली दिसुन येते. शिवनेरी हा किल्ला म्हणुन उदयाला येण्याआधी बौद्ध लेण्यांचे आश्रयस्थान होता. इ.स. २०० वर्षांपुर्वी अस्तित्वात आलेल्या ताम्रपाषाण युगीन ग्रामीण संस्कृती उभारणी महाराष्ट्रात देखील केलेली दिसुन येते. सातवाहन काळात उदयाला आलेल्या अनेक शहरांना मातीत बांधलेले कोट दिसुन येतात. राष्ट्रकुट काळात कंधार आदी, ठिकाणी दुर्गस्थापना झालेली दिसुन येते. यादवकाळात अत्यंत जटील दुर्गरचना अस्तित्वात आल्याचे दिसुन येते. देवगिरी किल्ल्यावर झालेल्या खिलजी आक्रमणानंतर महाराष्ट्रावर इस्लामधर्मीयांच्या राजवटी स्थापन झाल्या. या कालखंडात अस्तित्वात आलेल्या दुर्गांचे वैशिष्ट्य म्हणजे हे विशुध्द लढाऊ किल्ले म्हणुन मानवी वस्तीपासुन दुर वेगळे स्थान विकसित केले गेले. प्रचलित असणारी नगरदुर्गांची परंपरा चालु होती.



अर्थात डोंगरकपारीतील लढाऊ ठिकाणे सातवाहनकाळापासुन अस्तित्वात असावित, पण याचा निश्चित पुरावा सुलतानी कालखंडातील राजवटींपासून निर्माण झालेल्या किल्ल्यांच्या स्वरुपात आढळतो. अशा प्रकारे शिवरायांनी स्वराज्य स्थापन करण्याआधी अनेक किल्ले अस्तित्वात होते. यात भुईकोट किल्ले, गिरीदुर्ग व पाणकोटांचा समावेश होता. शिवाजी महाराजांनी स्वराज्य रक्षणासाठी किल्ल्यांचे महत्त्व जाणून अस्तित्वात असलेले किल्ले जिंकुन घेणे याबरोबरच नवीन किल्ल्यांच्या निर्माणाला प्राधान्य दिले. ताब्यात असलेल्या गडकोटांची निगा त्यांची सुरक्षा व्यवस्था व नवदुर्ग निर्मितीस



आवश्यक कार्यपद्धती याविषयी महाराजांची दुरदृष्टी आज्ञापत्रांमध्ये ठळकपणे दिसुन येते. आज्ञापत्रांमध्ये विषद कार्यपद्धती आजही दुर्गसंवर्धनासाठी जतनासाठी उपयुक्त आहे. याचा मार्गदर्शक तत्त्व म्हणुन वापर करुन गड कोटांच्या जतन कार्याचे नियोजन केले जाऊ शकते.

महाराष्ट्रातील विशेषत: शिवाजी महाराजांनी वसवलेले, दुरुस्ती करुन घेतलेले, जिंकलेले तसेच शिवकाल व पेशवाईशी अर्थात मराठा साम्राज्याशी निगडीत सर्व दुर्ग आज मराठी मनाचा मानबिंदू व मराठी अस्मितेचे प्रतीक बनले आहेत. शेवटच्या मराठा-इंग्रज युद्धानंतर अनेक किल्ल्यांच्या वाटा ब्रिटीशांनी उध्वस्त केल्या. संपुर्ण भारतीय उपखंडात ब्रिटीशांचे राज्य स्थापन झाल्यानंतर संरक्षण व्यवस्थेत या गडकोटांचे वेगळे महत्व उरले नाही. गड राखणीसाठी आवश्यक शिबंदी अस्तित्वात राहीली नाही. मानवी वावर संपल्यावर निसर्गाने आपले कार्य सुरुच ठेवले व गडकोट परत दाट झाडीझुडूपांनी वेढले गेले. पश्चिम घाटातील अधिक पर्जन्यमानामुळे ही झीज झपाट्याने सुरु राहीली. हे गड पेंढारी लुटारु, जंगली श्वापदे, वटवाघळे आदींची आश्रयस्थाने बनली. ब्रिटीश राजवटीच्या गुलामगिरीच्या जोखडातुन मुक्ततेच्या प्रयत्नात प्रेरणास्थळांचा शोध घेतांना विस्मृतीत गेलेल्या गडकोटांवर जनतेचा वावर चालू झाला. राष्ट्रभक्तीच्या प्रतीकांच्या पुर्नजीवनाच्या, प्रयत्नातुन एका अर्थाने गडकोटांचे संवर्धन व जतन सुरु झाले. असे म्हणता येईल. १८५१ साली स्थापन झालेल्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाच्या उद्दीष्टांमध्ये एत्तदेशीयांच्या पुरातन स्मारकांचे दस्ताऐवजीकरण व नंतरच्या काळात त्यांचा राष्ट्रीय वारसा म्हणुन संरक्षण ही कार्यक्षेत्रे ठरवण्यात आली. केंद्र सरकारबरोबरच स्थानिक प्रांतीय सरकार व काही संस्थानी पुढाकार घेतला. यात मंदिरे, भुईकोट, कातळलेणी, मकबरे, इ.च्या संवर्धनाची कामे झपाट्याने झाली. गिरीदुर्गांचे संवर्धन एक प्रकारे दुर्लक्षितच राहीले. यामागील कारणांचा विचार करता अनेक बाबी पुढे येतात, सर्वप्रथम गिरीदुर्गांचे भौगोलिक स्थान ही सवंर्धन कार्य करण्यास पहिली अडचण ठरते अवघड ठिकाणी अपुऱ्या मनुष्यबळात किल्ल्याची राखण व दुरुस्ती ही अवघड बाब होऊन बसते.



आज महाराष्ट्रात ज्ञात असलेल्या अदमासे साडेचारशे किल्ल्यांपैकी केवळ ५१ किल्ले केंद्र शासन अर्थात भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण व ४९ किल्ले राज्य शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाद्वारे संरक्षित केलेले आहेत. या किल्ल्यांचा आकार, त्यांची बिकट अवस्था बघता या सरकारी विभागांकडे असणारे निधी व मनुष्यबळ अत्यंत तुटपुंजे आहे हे दिसुन येते.या पैकी अनेक किल्ले व त्यातील अज्ञात इतिहास अनेक दुर्गप्रेमींच्या अथक प्रयत्नांतुन उजेडात आलेले दिसुन येतात.

सर्वसामान्यत: इतिहास संशोधन व पुरातत्त्वीय अध्ययन या दोन बाबी एकच आहेत या गैरसमजुती पोटी आज अनेक गोंधळ दिसुन येतात. या दोहोंशिवाय पुरातन वास्तुंचे जतन व संवर्धन हा तिसरा निराळा विषय आहे हे ही ठळकपणे नमुद करावेसे वाटते. माहितीतुन किल्ल्यांच्या इतिहासाची पुर्नबांधणी शक्य होते. हा अभ्यास मुख्यत: इतिहासकार निरनिराळ्या दप्तरातील कागदपत्रांच्या आधारे करतात. पुरातत्वेवेत्ते जमिनीखाली गाडले गेलेले अवशेष उत्खनन करुन बाहेर काढतात व त्याचे शास्त्रशुद्ध विश्लेषण करुन त्या स्थळाच्या भूतकाळाची पुर्नबांधणी करतात, त्याचबरोबर जमिनीवर उभे असलेले अवशेष वा वास्तु यांचे शास्त्रशुद्ध नोंदणीकरण करतात. या कामी रेखाकार व वास्तुविशारद यांचाही महत्वाचा हातभार लागतो. यापुढे या वास्तुंचे वा दुर्गाचे संवर्धनाचे कार्य हाती घेण्याआधी संवर्धनकारकास ऐतिहासिक पुरातात्विक पुरावे अत्यंत चांगल्या पद्धतीने माहिती असणे गरजेचे असते. या संवर्धनाच्या प्रकल्पाचे आरेखन संवर्धन कार्यात नैपुण्य असणारे वास्तुविशारद करतात. यातील वास्तुच्या तांत्रिक बाबींवर



वास्तु अभियंता निर्णय घेतात. या संपुर्ण प्रकल्पाची देखरेख पुरातत्वेत्यां द्वारा केली जाते, कारण वास्तुची स्थापत्य शैली, वास्तुची प्राचीनता, त्याकाळात बांधकामासाठी वापरलेले साहित्य, त्या वास्तुत ऐतिहासिक काळात झालेले बदल या सर्व बाबींचा त्यांचा अभ्यास असणे आवश्यक अपेक्षित असते. यासाठीच संवर्धन कार्य चालू करण्याआधी स्मारकाची स्थिती सर्वकश नोंदणी अत्यंत आवश्यक आहे. याशिवाय केलेले संवर्धन जतन कार्य हे इतिहासाचे एका अर्थाने विद्रुपीकरण ठरते. संवर्धन करतांना या वास्तु वैशिष्ट्यांसह जतन कार्य पुर्ण करावे लागते त्यामुळेच वास्तुची ऐतिहासिकता





जपली जाते. त्यामुळेच तज्ज्ञांच्या देखरेखीखाली न झालेली संवर्धन धोकादायक ठरु शकते.
आज पुरातत्व विभाग सोडून वन विभाग तसेच पर्यटन विभाग हे ही संवर्धन तसेच अनेक विकास कार्यांमध्ये इच्छुक असलेले दिसुन येतात. यात उद्देश कितीही चांगला असला तरी पुरातात्वीक वास्तु व अवशेषांचे संवर्धन कार्य शास्त्रशुद्धरित्या पुरातत्वज्ञ व संवर्धन वास्तुविशारदांच्या देखरेखेखाली केले जाणे हे अधिक योग्य आहे. गडप्रेमींच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन महाराष्ट्र सरकारने गडसंवर्धन समितीने शिफारस केलेल्या राज्य शासनाअंतर्गत १४ किल्ल्याच्या संवर्धन कार्याचा पहिला टप्पा पुर्ण केलेला आहे. दुसऱ्या टप्प्यातील किल्ल्यांच्या निवडीचे, त्यावर केल्या जाणाऱ्या संवर्धन कार्याच्या आराखडा निर्मितीचे कामही पुर्ण होत आले आहे. या कार्याची व्याप्ती व दर्जा वाढवणे आवश्यक आहे. यात गिरीमित्र सारख्या संस्थांचा व पर्यायाने जनतेचा या कामातील सहभाग महत्वाचा ठरतो. अशा संस्थांनी नक्की काय करावे, संवर्धन कार्य हाती घ्यावे अथवा नाही अशा अनेक बाबींवर ऊहापोह होणे आवश्यक आहे. ज्या वास्तु केंद्र व राज्य शासनाच्या संरक्षणात आहेत अशा ठिकाणी संवर्धन कार्य पुरातत्व विभागानेच करावे. असंरक्षित




किल्ल्यांवर वन विभाग वा पर्यटन विभागने काही कार्य करायचे असल्यास त्याचा विस्तृत आराखडा पुरातत्त्व विभागासमोर सादर करुन त्या विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र व देखरेखीखाली असे कार्य केले जावे. हे प्रस्ताव केवळ संवर्धन वास्तुविशारदांद्वारा तयार केले जावेत. खाजगी मालकीत असलेल्या किल्ल्यांचे संवर्धन करायची संस्थांची इच्छा असल्यास हीच पद्धत अंमलात आणता येईल.
आज मानवी हस्तक्षेपामुळे होणारे नुकसान मोठे आहे. हे थांबवण्यासाठी किल्ल्यांवरील पहारा वाढवणे तसेच जनजागृती करणे ही दोन महत्वाची कामे संस्थांना हाती घेता येतील. या दोन्ही कामांसाठी आवश्यक मनुष्यबळ आज शासनाकडे नाही. काही ठरावीक किल्ल्यांवर गर्दीच्या दिवशी स्वयंसेवकांनी पहाऱ्यासाठी उभे राहणे तसेच शालेय व महाविद्यालयीन स्तरावर वारश्यासंबंधी जनजागृतीचे काम संस्था समर्थपणे करु शकतील. अनेक ठिकाणी झालेली रिप्लास्टरींगची कामे ही केवळ पर्यटकांनी नावे खरवडल्यामुळे पुर्ण वाया गेल्याची उदाहरणे आहेत. काही ठिकाणी गडावरील वस्तु आठवण म्हणुन बरोबर नेणे हेही त्या वास्तुच्या नाशास कारणीभूत ठरते. गडावरील वास्तुंमध्ये वा खोदलेल्या कातळलेण्यात चूल पेटवणे यामुळेही या वास्तुंचे अक्षम्य नुकसान होते. मानवनिर्मित कचरा, खरकटे अन्न, विष्ठा, यांमुळे गडाच्या बिकट अवस्थेत भरच पडते. सरकारी विभागांनी यासाठी मुख्य किल्ल्यापासुन थोडे दुर एखाद्या मेटावर वा माचीवर यासंबंधी सुविधांची निर्मिती करणे. तात्पुरत्या कॅम्पिंगसाठी योग्य जागा निवडणे व त्याच ठिकाणी पर्यटन राहतील हे बघणे हेही काम शासन व संस्थानी एकत्रीत करावे. तसेच कोव्हीडसारख्या आपत्तीजनक परिस्थितीतही गडकोट जनतेसाठी खुले केल्यास काय नियम पाळून हे शक्य होईल याविषयी अभ्यास व नियमावली बनविण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे.
आज या किल्ल्यांचे स्वरुप पर्यटन स्थळांचे झाले असले तरी ही राष्ट्राला प्रेरणा देणारी केंद्र व्हावीत व पूर्वजांचा इतिहास नवीन पिढीस कळावा या हेतूने या गडकोटांचे संरक्षण व संवर्धन होणे गरजेचे आहे. महाराष्ट्र धर्माचे प्रतिक म्हणून ओळखले जाणारे किल्ले जतन होण्यासाठी शासन व जनता यांनी एकत्रित हे शिवधुनष्य पेलण्याची गरज आहे.

**डॉ. तेजस गर्गे,**
**(राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे संचालक )**

**शिवाजी महाराज – चित्रकार – सुनील देशमुख**
**रायगड – चित्रकार – आरती दुगल**
**छायाचित्र– सुनील देशमुख, महेंद्र गोवेकर , Google**





# अष्टहजारी शिखरांची सप्तपदी

– उमेश झिरपे


१९ मे २०१२ रोजी गिरिप्रेमीच्या आठ गिर्यारोहकांनी भारताचा तिरंगा जगाच्या सर्वोच्च शिखरावर म्हणजेच माऊंट एव्हरेस्ट फडकविला व इतिहास रचला. गिरिप्रेमीची मोहीम माऊंट एव्हरेस्ट शिखरावर आयोजित केलेली भारतातील सर्वात मोठी व सर्वात पहिली यशस्वी नागरी मोहीम होती. गिरिप्रेमीच्या विविध गिर्यारोहकांनी, पाठीराख्यांनी, हितचिंतकांनी, स्वयंसेवकांनी, प्रायोजकांनी बघितलेले भव्यदिव्य स्वप्न एव्हरेस्टच्या यशामुळे पूर्ण झाले होते. १९८२ ला स्थापना झाल्यापासून पुढे ३० वर्षांत गिरिप्रेमीने सह्याद्रीच्या कातळकड्यांवर, अजस्त्र सुळक्यांवर चढाई केली होती तसेच भारतीय व नेपाळ हिमालयातील अनेक शिखरांना गवसणी घातली. मात्र, एव्हरेस्टचे यश उत्तुंग होते, जगातील सर्वोच्च शिखरावर मोहीम यशस्वी करणे, हे गिरिप्रेमीच्या तोपर्यंतच्या इतिहासातील कळसाध्याय होता. एव्हरेस्ट शिखर मोहीम यशस्वी झाली, जगातील सर्वोच्च शिखरावर एकदा नाही तब्बल आठ वेळा तिरंगा फडकविला. गिरिप्रेमीच्या आशिष माने, प्रसाद जोशी, कृष्णा धोकले, रूपेश खोपडे, चेतन केतकर, सुरेंद्र जालिहाळ, राहुल येलंगे व टेकराज अधिकारी यांनी माऊंट एव्हरेस्ट शिखरावर यशस्वी चढाई केली. या यशानंतर आम्हा गिरीप्रेमींना सर्वांचाच प्रश्न होता, 'एव्हरेस्ट झाले, आता पुढे काय?'

एव्हरेस्ट चढाईचे यश हे अलौकिक आहे, विलक्षण आहे. त्यामुळे सामान्यपणे एव्हरेस्ट चढाई झाली म्हणजे गिर्यारोहणातील आव्हानांची परिसीमा गाठली असा समज होतो. मात्र, वस्तुस्थिती वेगळी आहे. होय, एव्हरेस्ट नक्कीच सर्वोच्च आहे, राहणार आहे. त्याची आव्हाने देखील तेवढीच खडतर आहे. मात्र त्याच सोबत एव्हरेस्टपेक्षाही आव्हानात्मक शिखरे हिमालयात डौलाने उभी आहेत. यात प्रामुख्याने समावेश होतो अष्टहजारी शिखरांचा. अष्टहजारी शिखर म्हणजे ज्या शिखरांची ऊंची ही ८ हजार मीटरपेक्षा जास्त आहे. आठ हजार हे परिमाणच आव्हानात्मक आहे. हाडे गोठवणारी थंडी, सतत अतिशय वेगाने वाहणारा वारा, उणे ४० अंश किंवा त्याहून कमी तापमान आणि हवेतील ऑक्सिजनचे प्रमाण अतिशय विरळ म्हणजे १ ते २ टक्के. अशा वातावरणात कृत्रिम ऑक्सिजन शिवाय काही मिनिटे तग धरणे जिवावर बेतू शकते. त्यामुळे ८ हजार मीटरपेक्षा अधिक उंचीला डेथ झोन असे संबोधतात आणि या डेथ झोनमध्ये शिखर चढाई करणे गिर्यारोहणातील परमोच्च आव्हान समजले जाते. ८ हजार मीटरपेक्षा अधिक उंचीची जगामध्ये १४ शिखरे आहेत. ही सर्व १४ शिखरे हिमालयात वसलेली आहेत. माऊंट एव्हरेस्ट (८८४८ मीटर), माऊंट के २ (८६११ मीटर), माऊंट कांचनजुंगा (८५८६ मीटर), माऊंट ल्होत्से (८५१६ मीटर), माऊंट मकालू (८४८५ मीटर), माऊंट च्यो ओयू (८१८८ मीटर), माऊंट धौलागिरी-१ (८१६७ मीटर), माऊंट मनास्लु (८१६३ मीटर), माऊंट नंगा पर्वत (८१२५ मीटर), माऊंट



अन्नपूर्णा-१ (८०९१ मीटर), माऊंट गशेरब्रुम-१ (८०८८ मीटर), ब्रॉड पीक (८०५१ मीटर), गशेरब्रूम-२ (८०३४ मीटर) व माऊंट शिषापंग्मा (८०२७ मीटर) अशा चौदा शिखरांचा अष्टहजारी शिखर यादीत समावेश होतो. जगामध्ये या सर्व चौदा शिखरांवर चढाई करणाऱ्या एकूण ६० च्या आसपास व्यक्ती आहेत. भारतातील एकाही व्यक्तीने या चौदा शिखरांवर चढाई केलेली नाही. व्यक्तीच काय, संस्थात्मक पातळीवर देखील यश मिळालेले नाही. एकाही भारतीय संस्थेला सर्व अष्टहजारी शिखरांना गवसणी घालता आलेली नाही. त्यामुळे जेव्हा २०१२ साली एव्हरेस्ट चढाई झाली, तेव्हा पायाभरणी झाली गिरिप्रेमीच्या 'क्वेस्ट ऑम एटथाऊसंडर' ला. जगातील सर्वच अष्टहजारी शिखरांना गवसणी घालण्याचे शिवधनुष्य आता गिरिप्रेमी पेलणार होते.

२०१३ साली गिरिप्रेमीने 'ल्होत्से- एव्हरेस्ट' या जोड मोहिमेचे आयोजन केले होते.





माऊंट ल्होत्से या ८५१६ मीटर उंचीच्या जगातील चौथ्या उंच शिखरावर गिरिप्रेमीचा शिलेदार चढाई करणार होता. ल्होत्से व एव्हरेस्ट हे सख्खे शेजारी, त्यामुळे एकाच बेस कॅम्पवरुन दोन्ही मोहिमा आयोजित करता येऊ शकत होत्या. २०१२ च्या मोहिमेच्या वेळी काही कारणांमुळे शिखर चढाईचे यश हुकलेल्या गिर्यारोहकांसाठी ल्होत्सेच्या जोडीने एव्हरेस्ट मोहीम देखील आयोजित करण्यात आली होती. या मोहिमांमध्ये गिरिप्रेमीच्या आशिष माने याने माऊंट ल्होत्सेवर यशस्वी चढाई केली तर आनंद माळी, गणेश मोरे व भूषण हर्षे यांनी 'माऊंट एव्हरेस्ट' वर तिरंगा' फडकविला.



२०१२ व २०१३ अशा दुहेरी यशानंतर वेळ होती हॅट्रिकची. २०१४ साली गिरिप्रेमीच्या आशिष माने व आनंद माळी यांनी माऊंट मकालू या ८४८५ मीटर उंचीच्या जगातील पाचव्या उंच शिखराचे आव्हान स्वीकारले. मात्र हे आव्हान अत्यंत खडतर होते. मोहीम अक्षरशः अर्ध्यावर सोडून परतावे लागते की काय अशी परिस्थिती होती. मात्र, गिरिप्रेमीच्या आशिष माने याने आनंद माळीच्या साथीने झुंज देत माऊंट मकालूवर भारताचा तिरंगा फडकविला. या मोहिमेची विशेष बाब म्हणजे आशिष माने हा माऊंट मकालूवर चढाई करणारा पहिला भारतीय नागरिक (Civilian) आहे.

२०१५ साली गिरिप्रेमीचा संघ माऊंट धौलागिरीवर चढाई करणार होता, मात्र नेपाळमध्ये आलेल्या भूकंपामुळे मोहीम पुढच्या वर्षी ढकलण्यात आली. २०१६ साली गिरिप्रेमीच्या संघाने माऊंट च्यो ओयू या ८१८८ मीटर उंचीच्या जगातील सहाव्या उंच शिखरावर व तसेच माऊंट धौलागिरी-१ या ८१६७ मीटर उंचीच्या जगातील सातव्या उंच शिखरावर जोड मोहीम आयोजित केली होती. यात गणेश मोरे व डॉ. सुमित मांदळे यांनी माऊंट च्यो ओयू तर प्रसाद जोशी याने माऊंट धौलागिरीवर भारतीय तिरंगा फडकविला. माऊंट धौलागिरीवर चढाई करणारा प्रसाद जोशी हा पहिला भारतीय नागरिक आहे. २०१६ च्या जोड मोहिमेनंतर गिरीप्रेमीच्या आशिष माने व अक्षय पत्के यांनी २०१७ साली माऊंट मनास्लु या ८१६३ मीटर उंच जगातील आठव्या उंच शिखरावर तिरंगा फडकविला व गिरिप्रेमीच्या सहा वर्षात सहा अष्टहजारी मोहिमा यशस्वी झाल्या.

या यशानंतर गिरिप्रेमीने पुन्हा एकदा मोठा संघ घेऊन माऊंट कांचनजुंगा या ८५८६ मीटर उंच जगातील तिसऱ्या उंच शिखरावर मोहीम आयोजित केली. माऊंट कांचनजुंगा या आव्हानात्मक शिखर, एव्हरेस्टपेक्षा चढाईसाठी कैकपटीने अवघड. त्यामुळे अनुभवी व तुलनेने नवोदित गिर्यारोहकांचा मिलाफ असलेला तगडा संघ घेऊन आम्ही कांचनजुंगा शिखर मोहिमेवर गेलो. या संघात १० गिर्यारोहक चढाई करणार होते. १५ मे २०१९ रोजी पहाटे गिरिप्रेमीच्या दहाही गिर्यारोहकांनी माऊंट कांचनजुंगा या जगातील तिसऱ्या उंच शिखरावर यशस्वी चढाई केली व पुन्हा एकदा इतिहास रचला. एकाच दिवशी एकाच संघातील दहा जणांनी कांचनजुंगा शिखरमाथा चढाई करणे, हे इतिहासात पहिल्यांदा घडत होते. या मोहीमचे आंतराष्ट्रीय नेतृत्व हे गिरिप्रेमीकडे होते. रूट ओपनिंग करणाऱ्या शेर्पांचे समन्वय असो की कॅम्प ४ वरुन इतर संघातील दोन गिर्यारोहकांचा रेस्क्यू असो. या मोहिमेची संपूर्ण जबाबदारी गिरीप्रेमीने उचलली होती. ही नुसती चढाई मोहिम नव्हती तर पर्यावरण पूरक अशी ईको मोहीम होती. याद्वारे संशोधकांना हवे असलेले अति उंचीवरील विविध नमुने संघाने गोळा करून संबंधित संशोधन संस्थांना सुपूर्त केले.

माऊंट कांचनजुंगाच्या यशासोबतच सलग सात वर्षांत सात अष्टहजारी शिखरांवर यशस्वी चढाई करणारी गिरिप्रेमी एकमेव भारतीय संस्था बनली. या सातही मोहिमांचे नेतृत्व मला करता आले, तसेच सर्व मोहिमांतील सदस्य सुखरूप घरी परत आले याचे मला अपार समाधान आहे. तसेच या निमित्ताने गिर्यारोहण विश्वात अशी कामगिरी करणारा मी एकमेव भारतीय गिर्यारोहण नेता बनलो, याचा आनंद आहे. गिरिप्रेमीच्या कामगिरीची दखल घेत आमच्या संघातील दोन गिर्यारोहकांना 'श्री शिव छत्रपती क्रीडा पुरस्कार' या महाराष्ट्रातील अव्वल क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.





गिरिप्रेमीच्या या सात अष्टहजारी मोहिमांनी देशाला काय दिले, याबद्दल सिंहावलोकन केले असता असे लक्षात येते की भारतीय गिर्यारोहकांमध्ये आत्मविश्वास जागृत करण्याचे काम या मोहिमांनी केले आहे. आपणही करू शकतो या निश्चयाने भारतीय तरुण गिर्यारोहक एव्हरेस्ट व इतर अष्टहजारी शिखरांवर चढाई करताना दिसत आहेत. गिरिप्रेमीच्या २०१२ च्या यशानंतर पुढील वर्षांमध्ये भारतीय गिर्यारोहकांनी एव्हरेस्ट शिखर चढाई केल्याचे आकडे गिरिप्रेमीने सुरू केलेल्या परंपरेची पताका पुढे चालू असल्याचे दर्शवितात. त्याच सोबत भारतीय गिर्यारोहणाचे नाव जगाच्या पटलावर ठळक करण्याचे काम या मोहिमांमधून झाले आहे. गिर्यारोहण, ट्रेकिंग, साहसी खेळ हे जनमानसांत रुजण्यासाठी, गिर्यारोहणाचा प्रसार व प्रचार होण्यासाठी गिरिप्रेमीच्या या यशाने मोलाची भूमिका बजावली आहे.

हा प्रवास आता मध्यावर येऊन थांबला आहे. अजून सात अष्टहजारी शिखरांना गवसणी घालण्यासाठी गिरिप्रेमीचे शिलेदार कसून तयारी करत आहेत. जगभरामध्ये एकट्या-दुकट्याने आखल्या जाणाऱ्या गिर्यारोपण मोहिमा संघ पातळीवर आयोजित करून, संघांचे यश हेच आपले यश अशी संघभावना दृढ करून गिरिप्रेमी गिर्यारोहणातील नवे आयाम उभा करत आहे. हा प्रवास असाच निरंतर चालू राहील व नववीन शिखरांना गिरिप्रेमी गवसणी घालेल, हा विश्वास आहे.

**उमेश झिरपे**
**(जेष्ठ गिर्यारोहक, गिरिप्रेमी संस्था)**



# मोहक ईशान्य

– ॐकार धुळप

रात्री ८:२० ला गुवाहाटीला परतीच्या विमानात बसलो. पुढचा स्टॉप दिल्ली, ३ तास थांबून पुन्हा भल्या पहाटे पुण्याचे विमान. लिहायला मोकळा वेळ असल्याने गेल्या १० दिवसांत अनुभवलेल्या गोष्टींची मनात उजळणी सुरु झाली. वास्तविक या ट्रिपबद्दल लिहायचे २–३ दिवसांपूर्वीच मनात आलेले. पण गर्दीने ओसंडून वाहणाऱ्या स्टेट ट्रान्सपोर्टच्या बसमध्ये त्यावेळी लिहिणे शक्य झाले नाही. आणि नेहमीप्रमाणे नुसते प्रवासवर्णन लिहिण्यापेक्षा यावेळी आडवाटेला भेटलेली मंडळी; त्यांचे, या ईशान्य–पूर्वेतल्या जागांचे वेगळेपण, मिळालेले अनुभव, त्याहीपेक्षा अनुभवातून मिळालेल्या शिकवणी याबद्दल लिहिण्याची इच्छा होत आहे. घरचा प्रवास लांबचा आहे, पण हळूहळू झोपसुद्धा यायला सुरुवात झालेली आहे, बघू सुरुवात तरी करतो.

लहानपणापासून माझी ईशान्य–पूर्वेतील राज्यांना भेट देण्याची इच्छा. त्यामुळे पुण्याच्या मित्र परिवारात डिसेंबरातले प्रवासाचे समीकरण वर–वर मांडून ठेवले. प्रथमेश नान्नजकरने लागलीच सोबत यायची तयारी आणि तिकिटे काढायला होकार देऊन टाकला. दिवाळीच्या आसपास विमान प्रवासाची तिकिटे काढली. एकाच किमतीत जास्त फिरायला मिळावे म्हणून, ईशान्य–पूर्व सोबत कोलकात्याचीही वर्णी आमच्या यादीत लागली. पुणे–कोलकाता–गुवाहाटी प्रवास, फक्त पाठीवर मावेल एवढे सामान आणि पुढचे–पुढे बघू असे ठरले. सामानाची जास्त काळजी नव्हती, अगदी मोजून सांगायचे तर एअरपोर्ट चेक–इन काउंटरला तिघांच्या १० दिवसांच्या बॅगपॅकचे प्रत्येकी वजन फक्त ७ किलोग्रॅम भरले.

पण फिरायचे काय–कसे? आणि राहायचे कुठे? सगळे हवेत होते. फिरण्याची साधारण ७–८ ठिकाणे, राहायच्या काही जागा आणि प्रवासाला कुठे काय मिळेल ते पाहून ठेवलेले. माझ्यामते भटकंती अशीच ठिपक्यांच्या चित्राप्रमाणे असावी. साधारण रूपरेषा दिसावी पण ठिपक्याला ठिपका जोडत, गाव–माणसांचे रंग भरत ती पूर्ण व्हावी. घरून निघतानाच पूर्ण चित्र घेऊन निघालो तर परतेपर्यंत ते जपण्याचा प्रयत्न करावा लागतो. एखादा ठिपका सोडण्याची किंवा हवा तो रंग भरण्याची मोकळीक मिळत नाही. गुवाहाटीतल्या एखाद्या पॅकेज–टूर ऑपरेटर सोबत मोलभाव करून अधिकाधिक ठिकाणांना भोज्या करण्यासाठी धावणारी अनेक लोकं प्रवासात भेटली. याच्या अगदी उलट आवडेल त्या ठिकाणी वाटेल तेवढे दिवस राहिलेले अवलियेसुद्धा भेटले. आमची गणती कुठे होत होती यात? लहानपणी फीरताना देश–विदेशातील बॅगपॅकर्स पाहिले कि, हे लोक असे कसे महिनोन्महिने प्रवास मॅनेज करतात याचे अप्रूप वाटे. पण आता त्यातली गंमत हळूहळू कळू लागली आहे; त्याहीपेक्षा आवडू लागली आहे. असाच एक जर्मनीतला बॅगपॅकर 'लिओ' या प्रवासात कुठल्याश्या कोनाडातल्या खेड्यात भेटला. जर्मनीतल्या एका प्रतिष्ठित विद्यापीठातून कॉम्पुटर सायन्समध्ये मास्टर्स करणारा आणि अस्खलित इंग्रजी बोलणारा हा विशीतला पठ्या एका सेमिस्टरचा ब्रेक घेऊन इंग्रजी शिकण्याच्या बहाण्याने भारतात आलेला. गाठीला फ्रीलांसिन्गाच्या प्रोजेक्ट्स मधून कमावलेले पुरतील एवढेच पैसे. दिवसाचे निश्चित ७०० रुपये बजेट, मग त्यासाठी कुठेही राहण्याची आणि काहीही खाण्याची तयारी. वाट नेईल तसा पुढचा प्रवास. जुजबी गणित मांडले तरी १८० दिवस गुणिले ७०० रुपये म्हणजे फक्त सव्वा लाख रुपये; आयुष्यभर पुराणाऱ्या अनुभवासाठी? महाग आहे का? त्याच्यामानाने आम्ही 'पैशाने' फार श्रीमंतीत रहात होतो; प्रत्येकी साधारण १५०० रुपये प्रत्येक दिवसाला. लिओ सारखीच गोष्ट ६ महिन्यांच्या सिबॅटीकल सुट्टीवर देश–विदेश भटकून त्याच कोनाडातल्या खेड्यात भेटलेल्या बंगलोरच्या श्रीधरची. कदाचित तीच गोष्ट हाताचे पैसे सांभाळत अजून किती दिवस फिरायला मिळेल याचा हिशोब सांगणाऱ्या इस्राईलच्या नितांत सुंदर नितसांची. गोष्टी सारख्याच पण अनुभवांचं गाठोडं प्रत्येकाचं आपल्या सोबत. स्वतःला जमेल झेपेल तेवढं.

कामाच्या व्यापात डिसेम्बरचा दुसरा आठवडा उजाडला तरी तिकिटांव्यतिरिक्त तयारी काहीच नव्हती. शेवटी गायत्रीने थोडा कडक पवित्र घेऊन फोनवरून आडवाटांना राहायची जुजबी व्यवस्था केली. या फोनाफोनीचा फायदा पुढे बराच झाला.

दिवसभर कोलोनिअल कोलकाता फिरून पुढच्या मुख्य प्रवासाला, मेघालयाला जाण्यासाठी निघालो. रविवार असल्याने गुवाहाटी–शिलाँग प्रवासासाठी पवनहंस हेलिकॉप्टर सेवा बंद आणि राज्य परिवहनाच्या बसेसचा भरोसा नसल्याने गुवाहाटी विमानतळाच्या टॅक्सी स्टॅन्ड मध्ये थोडी घासाघीस करून टॅक्सीने शिलाँगकडे निघालो. ईशान्येकडून दक्षिणेकडे हिमालयाला कापत बंगालच्या उपसागरास मिळणाऱ्या ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यात वसलेल्या गुवाहाटीमध्ये खूप पाणथळ जागा आहेत. याच्या अगदी उलट शिलाँग, पूर्णपणे डोंगरात वसलेले शहर. शिलाँगची उंची ५००० फुटांपेक्षा जास्त, त्यामुळे गुवाहाटी–शिलाँग महामार्ग संपूर्णपणे घाटरस्ता. जसे शिलाँग जवळ येऊ लागते तसा निसर्ग आणि तपमान



बदलासोबत मुखत्वे करून माणसांच्या दिसण्यामध्ये होणार बदल सहज लक्षात येतो. दुपारी साधारण २-३ ला गर्दीने खचाखच भरलेल्या पोलीस बाजारला टॅक्सी सोडली. स्वस्तातली रूम वेळेत रिकामी न झाल्यामुळे अधिक चांगली रूम कमी किमतीत मिळाली. हॉटेल ऑनलाईन बुक न करून फिरण्याचा अजून एक फायदा. कडाक्याच्या थंडीमुळे संध्याकाळी अमृतुल्यच्या २ फेऱ्या झाल्यावर जवळच असलेल्या वॉर्ड्स लेकला चक्कर मारण्यासाठी निघालो. चारही बाजूनी हिरव्यागार डोंगरांच्या खोबणीत वसलेला जलाशय. शिलाँगला स्कॉटलंड ऑफ ईस्ट का म्हणतात त्याचे उत्तर देणारा परिसर. सूर्यास्तापर्यंत निवांत वेळ काढून खरेदीसाठी शिलाँग मार्केटकडे मोर्चा वळवला. हरतऱ्हेचे मॅशनेबल कपडे कमी किमतीत मिळत होते. पण बॅगपॅकिंग टूर असल्याने सोबत सामान मोजकेच, त्यामुळे थोड्याफार खरेदीनंतर माझी सुटका झाली.

पुढे जायचे ठिकाण होते तळ दिसणाऱ्या निळ्याशार नदीचे गाव, डावकी. दुसऱ्या दिवशी पहाटे १-२ अंश तापमानात हॉटेलात नाष्टा आटपून जुना बाजारच्या दिशेने निघालो. थोडी घासाघीस करून प्रति माणशी १०० दराने एका जुनाट जीप ठरवली. अंतर जवळपास ८० किलोमीटर, पण डोंगराळ भाग असल्याने आणि अधे-मध्ये पॅसेंजरची चढ-ऊतर करत डावकिला पोहोचण्यासाठी तीन-चार तास लागले.



शिलाँगपेक्षा डावकिचीची उंची खूप कमी आहे त्यामुळे पुन्हा घाट-रस्ता. गावालगत भारत-बांगलादेश बॉर्डर पोस्ट असल्याने आर्मीचा खूप राबता, पण बॉर्डरचे गांभीर्य कमीच. मजा म्हणून भारतीय पर्यटक बांगलादेश हद्दीत जाऊन फोटो काढून येतात. पर्यटकांची खच्चून गर्दी. बाजारात त्यातल्या त्यात एका बऱ्या हॉटेलात पुरी-भाजी खाऊन आम्ही नदी किनाऱ्याकडे निघालो. एव्हाना डोक्यावर आलेल्या सूर्यकिरणांनी नदीचा तळ उजळून टाकलेला. इथे पुन्हा थोडी घासाघीस करून एका स्वस्त बोटीतून आम्ही नदीच्या वरच्या अंगाला छोटी सैर केली. परदेशातील पर्यटन स्थळांच्या तोडीस-तोड जागा पण बेशिस्त पर्यटक आणि प्राथमिक पर्यटन सुविधांचा अभाव त्यामुळे डावकितून लवकर निघण्याचे ठरवले.

पर्यटकांची मेघालय वारी डावकितून माघारी मिरते, पण आमचा त्या दिवशीचा मुक्काम डावकी नदीच्या पलीकडच्या तीरावर, वरच्या अंगाला असलेल्या Shnongpdeng गावी होता. अंतर अवघे ८ किलोमीटर पण विरुद्ध दिशेला असल्याने कोणी टॅक्सीवाला येण्यास तयार होईना. एक पोरसवदा टॅक्सीवाला तयार झाला, जॉन, वय जेमतेम १८. नवीकोरी मारुती झेन टॅक्सी, पण हिंदी किंवा इंग्रजी बोलण्याची अडचण. त्यामुळे 'आयेगा', 'जायेगा' आणि 'अंक' या मर्यादित शब्दात आमचे बोलणे झाले. डावकी नदीच्या काठाने डोंगर कड्यावरून आमचा प्रवास सुरु झाला. रस्ता अगदी खराब आणि निमुळता, जेमतेम एक छोटी गाडी जाईल एवढाच. वाटेत दरांग नावाचे गाव लागले. Shnongpdeng ला आमची राहण्याची सोय जोनाथन नावाच्या एका माणसाने फोनवरून केलेली. पण एवढे आड वाटचे खेडे असल्याने आणि आमच्या फोनला जेमतेम रेंज असल्याने परतण्यासाठी काही साधन मिळेल की नाही याची चिंता होती. Shnongpdeng या गावाबद्दल लिहावे तेवढे थोडे.



भारताच्या नकाशावर सापडणार पण नाही एवढेसे गाव. पण डोंगर उतारावरून दूरवरचे गाव पाहिले आणि क्षणात प्रेमात पडलो. जोनाथनला अजून एक दिवस राहायला मिळू शकते का याची विचारणा केली. जेमतेम साठ-सत्तर घरं, टुमदार चर्च, प्राथमिक शाळा आणि फुटबॉलचे मैदान. पावसाळ्यासाठी गावाशेजारी नदीवर केबल सस्पेन्शन ब्रिजची सोय आहे पण तो खूप उंचीवर असल्याने दैनंदिन वापरासाठी गावातील लोक बांबू पासून बनवलेला कमी उंचीचा पूल दरवर्षी नदीवर बांधतात. डावकि नदीचे खडकाळ पात्र रुंद पण डिसेंबरचा महिना असल्याने पाण्याचा प्रवाह खूप कमी. जोनाथनकडून समजले की हीच नदी पावसाळ्यामध्ये तीस चाळीस फूट उंचीवरून वाहते. बाजूच्या खडकांवर पाण्याच्या पातळीच्या खुणा आणि केबल सस्पेन्शन ब्रिजची उंची पाहून त्यात तथ्य असावे हेही जाणवले. नदीच्या दोन्ही तीरांवर २-३ कॅम्प साईट होत्या. गावाकडच्या बाजूची कॅम्प साईट ही गावाने सामुदायिकरित्या चालवलेली Community Managed Campsite होती. प्रत्येकाच्या कामाच्या वेळा आणि स्वरुप सर्वसंमतीने ठरलेले ज्यात नदीपात्रात कॅम्प साईट सेटअप करण्यापासून ते पर्यटकांना कयाकिंग, स्नोरकेलींग, क्लिम जम्पिंग, बोट राईड सारख्या खेळांमध्ये मार्गदर्शन करण्यापर्यंत कामांचा समावेश. कॅम्प साईटवर पूर्ण गावचा मालकी हक्क आणि कॅम्प मधून मिळणारा निधी गावाच्या विकासासाठी. स्वयंपूर्ण खेडे. बाकी डोंगर उतारावर प्रत्येकाची सुपारीची स्वतंत्र शेती. नदीच्या पलीकडच्या तीरावर खाजगी कॅम्प साईट होत्या, ज्यात एक होती जोनाथन आणि त्याच्या परिवाराची. मेघालयात मातृसत्ताक समाज पद्धती असल्याने गावातली सर्व महत्त्वाची पदे महिलांकडे आणि वारसा हक्काने मिळणारी वडिलोपार्जित मिळकत सुद्धा घरातील मुलींना मिळते. अजून अविवाहित असल्याने जोनाथन त्याच्या बहिणी सोबत कॅम्प साईट चालवत होता. एव्हाना दुपारचे अडीच-तीन वाजलेले, पण सूर्यास्त लवकर होत असल्याने आम्ही तंबूमध्ये सामान टाकून बोटीतून फिरण्यासाठी निघालो. कॅम्प पूर्ण रिकामा असल्याने आम्ही नदी जवळचां एक मोठा टेन्ट पकडला. रात्रीच्या शांततेत नदी अलीकडच्या तीरावरील



चर्चमधून मिडनाईट मास, क्रिसमस कॅरल आणि घंटानाद व्यवस्थित ऐकू येत होता. सकाळी लवकर उठलो पण मेघालय भारतीय प्रमाण वेळेच्या पुढे असल्याने सकाळी ६ वाजता देखील १०-११ सारखा सूर्यप्रकाश होता. नदीकिनारी उन्हात मस्त नाश्ता वगैरे उरकून कॅम्प साईटच्या आसपास फोटोग्रामी केली. सकाळी थोडा वेळ असल्याने काया-किंग आणि स्नॉर्कलिंग केले. जोनाथनने या दोन्ही गोष्टी नवीनच विकत आणलेल्या आणि तोदेखील ट्रायल साठी कोणीतरी शोधत होता. त्यावर आमचे आयतेच फावले. मनसोक्त काया-किंग आणि स्नॉर्कलिंग साठी कोणतेही पैसे मोजावे लागले नाहीत. Shnongpdengbm अजून एक दिवस राहणार असल्याने, दुसऱ्या दिवशी Mawlynnong, आशियातील सर्वात स्वच्छ खेडे आणि झाडांच्या जिवंत मुळांपासून विणलेला living root bridge पाहून आलो. तिसऱ्या सकाळी Shnongpdeng मधून पाय निघत नव्हता पण जोनाथनचा निरोप घेऊन Shnongpdengbm परत भेट देण्याची गाठ मनाशी बांधत रस्त्याच्या दिशेने निघालो. ठरल्याप्रमाणे जॉन वेळेवर गाडी घेऊन आला. गाडीत सामान भरून आम्ही पुढच्या मुक्कामी, चेरापूंजीला किंवा स्थानिक भाषेतलं सोहाराला जाण्यासाठी निघालो. Shnongpdeng ते चेरापुंजी अंतर साधारण ११५ किमी. परतीच्या शिलाँग रस्त्यावरच अर्ध्यात डावीकडे फाटा आहे. जगात सर्वात जास्त पाऊस पडणारे ठिकाण म्हणून लहानपणापासून चेरापुंजीची ओळख. जास्त पाऊस म्हणून मनात चेरापुंजीच हिरवागार चित्र. पण टॅक्सीमधून उतरलो आणि डोळ्यांवर विश्वास बसेना. सर्वत्र रखरखाट नावाला एक झाड जवळपास नाही. चेरापुंजी चुनखडीच्या दोन विस्तीर्ण पाठरांवर वसलेलं आहे. डोंगरांच्या उंचीनुसार अप्पर आणि लोअर सोहारां. वर्षानुवर्षे प्रचंड पाऊस सोसून माती संपूर्णपणे वाहून गेलेली आणि शेवटी खाली उरलेला चुनखडक. गावात शेती नाही की झाडं नाहीत. चुनखडकात पाणी धरून ठेवण्याची क्षमता नसते त्यामुळे पावसाळा संपला की रखरखाट. अगदी टँकरने पाणीपुरवठा होतो. पण हे पावसाचे पाणी वर्षानुवर्षे वाहून आसपासच्या चुनखडीच्या दगडांमध्ये प्रचंड मोठ्या आकाराच्या गुहा तयार झाल्या आहेत. त्यातल्या काही मोठ्या आणि सुरक्षित गुहा पर्यटकांना पायी पाहता येतात. बाकी बऱ्याच गुहा पर्यटकांसाठी अपरिचित, स्थानिकांच्या सहभागाने, केव्ह एक्सपीडिशन सारख्या खेळांना या भागात प्रचंड वाव आहे. जी जंगल- झाडी आहे ती सर्व दऱ्यांमध्ये. उघडेबोडके डोंगर आणि घनदाट दऱ्या, असे चेरापुंजी. लोअर सोहाराला हवामान खात्याचे डॉपलर रडार आहे; त्याला अगदी लागून आमचे होस्टेल होते. गायत्रीने फोन वरून होस्टेल बुक करताना आम्ही महाराष्ट्रातून येणार आहोत, सोबत गाडी नाही आणि पब्लिक ट्रान्सपोर्टने प्रवास करतोय हे समजल्यावर होस्टेलचे मालक जॉन पॉल काका स्वतः शिलाँगवरून सोहराला ५०-६० किमी गाडी चालवत आम्हाला भेटायला आले. आम्ही रस्त्यावर कोणतेही वाहन दिसत नसल्याने, फिरण्याची काय व्यवस्था करावी ह्या विचारात होतोच पण तो प्रश्न जॉन पॉल काकांनी सोडवला. एकही पैसा न घेता प्रसिद्ध सेव्हन-सिस्टर्स आणि नोहकलिकाई धबधबे, मौसमाय आणि आर्वाह गुहा दाखवल्या. एका वेळेला काही हजार माणसं मावतील एवढ्या मोठ्या आकाराच्या आणि अजून पूर्ण उत्खनन न झालेल्या गुहा. गुहांमध्ये आदिमानवाने काढलेली चित्रे आणि जीवाश्म बघायला मिळातात. पर्यटन खात्याच्या अखत्यारीत येत असल्याने गुहांमध्ये दिवाबत्तीची सोय आणि बाहेर प्राथमिक पर्यटन सुविधा आहेत. अशा प्रकारचे पर्यटन स्थळ माझ्या माहितीत भारतामध्ये एकमेव असावे.

सोहरा फिरणं झाल्यावर दुसऱ्या दिवशी या संपूर्ण ट्रिपचा शेवटचा टप्पा सुरू झाला. चेरापुंजीच्या पायथ्याशी असलेल्या घनदाट दऱ्यांमध्ये फिरण्याचा. न लागणारे सामान हॉस्टेलवर ठेवून, दोन दिवसाचे मोजके सामान छोट्या पिठूमध्ये भरले. मेघालय स्टेट ट्रान्सपोर्टच्या बसने तेरणा गावाकडे निघालो. दरीत उतरण्यासाठी तीव्र उतार असलेल्या, सिमेंट-काँक्रिटच्या, कमी रुंदीच्या तीन-साडेतीन हजार पायऱ्या. पुढचा पूर्ण प्रवास पायी. ट्रेक तसा कठीण श्रेणीतला. सुरवातीच्या पायऱ्यांमुळे काही हजार फूट उंची दीड दोन तासात कमी होते आणि तापमान आणि आर्द्रता अगदी एक आकड्यावरून १०-१५ अंशांनी वाढते; त्यामुळे पाणी पिण्यावर लक्ष नसेल तर





डी-हायड्रेशन मुळे स्नायू मध्ये क्रॅम्प येण्याची शक्यता अधिक. नेमका हाच त्रास मला आणि गायत्रीला झाला. तरी वेळेसोबत स्पर्धा करत आम्ही रेनाबो वॉटर फॉल पाहून Nongriat मध्ये दाखल झालो. पुढे रात्रीच्या मुक्कामाचे ठिकाण मिंटिंगचा रस्ता साधारण चाळीस मिनिटांचा पण सुर्यास्ताला काही मिनिटेच शिल्लक असल्याने Nongriat मध्ये Double Living Root ब्रिजपाशी अजिबात न थांबता पुढे निघालो. जंगलातल्या दरी मधली अनोळखी पायवाट आणि जेमतेम प्रकाश, पण सुदैवाने Nongriat मध्ये काही दिवस राहिलेले एक जर्मन जोडप सोबतीला होते. वाटेत मनरेगाच्या कुठल्याशा योजनेवर काम करणाऱ्या आमच्या होम-स्टेच्या मालकीणबाई भेटल्या. मिंटिंग गावात जाण्या-येण्यास त्या जंगलातल्या पायवाटेखेरीज दुसरा पर्याय नाही पण गावात वीज पोहोचलेली. गावापासून साधारण नजरेच्या टप्प्यात, भर जंगलात उंचावर बांधलेल्या तीन लाकडी खोल्या. दोन खोल्यात राहण्याची सोय आणि एकामध्ये स्वयंपाकघर. आंघोळ बाथरुमची सोय बाहेर. बाजूला झर्यातून वळवलेले २४ तास वाहते पाणी. थोडीशी मोकळी जागा आणि उघड्यावर डायनिंग. सगळं अगदी साधं जेवढ्यास तेवढं. पण या रात्री खरी रंगत आणली ती लिओ आणि श्रीधरने. प्रचंड गप्पा आणि हेवा वाटावा असे त्यांचे प्रवासाचे किस्से ऐकत पत्त्याचे नवे-नवे डाव रंगले. सकाळी सर्वांचा निरोप घेऊन परतीचा प्रवास सुरू केला. आदल्या दिवशीचा क्षीण आणि पुन्हा साडेतीन हजार पायर्यांची खडी चढाई. पण वेळेला एका पावलाचाच विचार करत पुन्हा तेरणा गावात येऊन पोहोचलो. दिवसातून एकदाच बसची सोय असल्याने आधीच सोहरासाठी परतीची टॅक्सी ठरवून ठवलेली. पुढच्या दिवशी जॉन पॉल काकांचा निरोप घेऊन टॅक्सिने शिलाँगकडे निघालो. वाटेत बांगलादेशची जन्मकथा सांगणारे वायुदलाचे संग्रहालय, एलिफंट वॉटरफॉल आणि शिलाँग व्हू पॉइंट पाहून शिलाँग मधल्या लैतमुख्रा भागातल्या हॉटेलात पोहोचलो. लैतमुख्रा भागातले कॅफे प्रसिध्द आहेत. पुढचा दिवस मेघालय आणि एकंदर ईशान्य- पूर्वेमधला शेवटचा दिवस. सकाळी शिलाँग मार्केट परिसरातून गुहावटी विमानतळासाठी टॅक्सी बुक केली, पण वाटेत गुवाहाटी स्थित आसाम राज्य संग्रहालय आणि कामाख्या मंदिर दाखवण्याच्या अटीवर. जाताजाता जमेल तेवढे गुवाहाटी पण बघण्याचा प्रयत्न. रेल्वे आणि विमान वाहतूकीमुळे गुवाहाटी, ईशान्य-पूर्वेतील महत्वाचे मोठे शहर त्यात नवीन वर्षातील पहिला आठवड्याचा दिवस असल्याने रस्त्यावर गर्दी होती. आम्ही सुद्धा याच गर्दीचा भाग होत संध्याकाळी धावत-पळत विमानतळावर पोहोचलो.

**टीप:** या प्रवासवर्णनात न छापलेले किस्से वाचण्यासाठी http://omkardhulap.in/ या संकेतस्थळावर भेट द्या

हिरवे प्रवासगाणे,
गुणगुणण्या जमलो आम्ही,
आम्ही प्रवासवेडे ।

तांबडा आमुचा मित्र,
दाखवी दिशा आम्हांला,
आम्ही प्रवासवेडे ।

पावले सदा भिरभिरती,
सावध सदैव नजरा,
आम्ही प्रवासवेडे ।

सावली कधी माथ्याला,
कधी रणरणते आकाश,
आम्ही प्रवासवेडे ।

तो कळस तिथे उत्तुंग,
पाऊल पडे एकेक,
आम्ही प्रवासवेडे ।

करी संगत उनाड वारा,
गुज सांगे झुळूक हळुवार,
आम्ही प्रवासवेडे ।

कधी रम्य, शांत अनुभव,
कधी देई भविष्यभान,
आम्ही प्रवासवेडे ।

इंद्रधनू सखे साथीला,
जपती ते एक विचार,
आम्ही प्रवासवेडे ।

हा गर्द अथांग प्रवास,
घेई अस्तित्वाचा शोध,
आम्ही प्रवासवेडे ।

हे प्रवासवेडे जगणे,
राहो अखंड चालत,
आम्ही प्रवासवेडे ।

**कवयित्री**
**-प्राजक्ता अद्वैत**



# हिमालयातील नद्या - वाहते सौंदर्य

आशियातील दहा मोठ्या नद्या हिमालयात उगम पावतात. यातील चीनमधील पीत नदी आणि यांगत्से नदी या किन्घाय पठारातून उगम पावतात. याशिवाय मेकाँग, सालवीन आणि इरावॅडी या नद्या तिबेटपासून दक्षिणेकडे आग्नेय आशियात वाहत जातात तर गंगा, ब्रह्मपुत्रा, यमुना, सिंधु, सतलज या नद्या हिमालयाच्या उत्तर आणि दक्षिण भागात वाहतात. या नद्यांचा उगम हिमनदी अथवा बर्फाची नदी (ग्लेशियर) पासून होतो. हिमालयातून उगम पावणाऱ्या नद्यांच्या खोऱ्यांमधून तीन अब्ज लोकांना पाणी, अन्न आणि ऊर्जा पुरवली जाते. या नद्यांच्या खोर्यांमुळे मोठ्या प्रमाणावर जंगले व जैवविविधता आढळून येते, म्हणूनच हिमालयाचे संवर्धन आणि संरक्षण दोन्ही महत्त्वाचे आहे.



**टौंस नदी, मोरी**
छायाचित्रकार: सुरेखा कोल्हाळ



**भागीरथी व अलखनंदा संगम, देवप्रयाग**
छायाचित्रकार: निनाद विलणकर



**पुष्पावती नदी, व्हॅली ऑफ फ्लॉवर्स**
छायाचित्रकार: निनाद विलणकर



**झंस्कार नदी, लद्दाख**
छायाचित्रकार: आनंद मयेकर



**अलखनंदा नदी, गोविंदघाट**
छायाचित्रकार: निनाद विलणकर



**बासपा नदी, चितकुल**
छायाचित्रकार: अभिजीत येवले



# कावळ्यांचे तत्वज्ञान

–डॉ. राजू कसंबे

मी गोरेगाव मुंबई येथे राहतो. लॉकडाउन झाल्यापासून (मार्च ते जून २०२०) बाहेर फिरायला मनाई होती. पण सुदैवाने आमच्या इमारतीचा टेरेस उघडा ठेवण्यात आला होता. मी एवढे दिवस सोसायटीच्या आजूबाजूच्या परिसरातील पक्ष्यांची टेरेस वरुनच निरीक्षणे घेतोय. मुंबईत सर्वात जास्त संख्या कावळे, चिमण्या आणि पारव्यांची आहे. त्यामुळे त्यांचीच जास्त निरीक्षणे घेतली जातात. पारव्यांचे मला विशेष कौतुक नसल्यामुळे मी त्यांच्याकडे विशेष लक्ष दिले नाही. पण कावळ्यांच्या प्रजनन वर्तणूकीचा मला अभ्यास करायचा होता. आता ती संधी चालून आली होती. दररोज काही तास निरीक्षणे करत गेलो. आणि शेवटी कावळ्यांबद्दल काय वाटले दिसले ते लिहून काढले. पण ते काय करतात, कसे वागतात हे लिहिण्यापेक्षा त्यांच्याकडून काय शिकण्यासारखे आहे ते मी लिहायचा प्रयत्न करणार आहे. त्यांचे हे शहरी जीवनाबद्दलचे अगदी साधे सोपे तत्वज्ञान. बघा भावते का ते!

**हार मानायची नाही:**

छोट्या छोट्या गोष्टी सुद्धा कधीकधी आपल्याला कठीण वाटतात. असे प्रसंग सर्वांच्याच जिवनात येतात. आता ही माणसांनी उगाच घट्ट बांधून ठेवलेली तार घरट्यासाठी चांगली आहे. ती सर्व शक्तिनिशी ओढून बघा. त्याला लटकुन तुमचे संपूर्ण वजन खर्च करून बघा. आज साधले नाही म्हणून हार मानू नका. उद्या पुन्हा नव्या जोमाने प्रयत्न करा. एक लक्षात ठेवा ती तार अजिंक्य नाही. हळूहळू तिची बांधणी सैल पडेलच. विजय आपलाच आहे. आपण तिला घरट्याच्या कामी लावूच.

**ॲडजस्ट करायला शिका:**

मोठ्या शहरात राहायचे असेल आणि यशस्वी व्हायचे असेल तर प्राप्त परिस्थितीशी जुळवून घ्यायला शिका. आपली संख्या वाढल्यामुळे सर्वांनाच राहायला चांगल्या जागा मिळतीलच ह्याची शाश्वती नाही. जमेल तिथे बस्तान मांडा. उघड्या फांदीवर, विद्युत खांबावर, सोसायटीच्या पाईपवर, जाहिरातीच्या होर्डिंगवर कुठेही. पण स्वस्थ बसू नका. नाही तर तुमचा वंश संपलाच म्हणून समजा.

**खाण्यापिण्याचे नखरे करू नका:**

आपल्या समाजाचे ब्रीदच आहे प्रत्येक हलणारी आणि मृत गोष्ट खाता येते. शाकाहारी मांसाहारी जास्त विचार करू नका. जे मिळेल ते खा. नखरे करू नका. सर्वच दिवस सारखे नसतात. पण कुठे भरपूर खाद्य दिसले तर एकटे खाऊ नका. ही आनंदाची बातमी जोरात ओरडून सर्वांना सांगा. इतरांनाही पोट आहे हे लक्षात असू द्या.

**शत्रूला विसरू नका:**

तुमच्यावर विनाकारण मुद्दाम हल्ला करणाऱ्या शत्रूला पक्के लक्ष्यात ठेवा. तो दिसला की टोचण्या मारून अथवा त्याच्या भोवती गोंगाट करून त्याला सळो की पळो करून सोडा. किमान वर्षभर तरी त्याला ही अद्दल घडली पाहिजे. नंतर आयुष्यात त्याने तुमच्याशी कधी पंगा घ्यायला नको. आणि हो इतर कावळ्यांना सुद्धा ह्या शत्रूबद्दल ओरडून ओरडून माहिती द्या. जेणे करून ते सुद्धा सजग होतील.

**एकीचे बळ:**

आपण सामाजिक पक्षी आहोत. कुणाच्या जीवावर संकट आले तर आरडाओरडा करून इतरांना मदतीला बोलवा. आजकाल पतंगांचा चिनी मांजा सर्व झाडांवर जिकडेतिकडे गुंतलेला दिसतो. आपले भाऊबंध त्यात फसले तर गोंधळ घाला. अग्निशमन दल येईपर्यन्त स्वस्थ बसू नका. प्रत्येकाचा जीव महत्त्वाचा आहे.

**नेहेमी सावध रहा:**


मांजर, कुत्रा आजूबाजूला भटकत असेल तर सर्वांना सावध करा. देवाने आपल्याला त्याकरीताच वाचा दिलेली आहे. त्यांच्यावर सावधता पूर्वक पाठीमागून हल्ला करा. विनाकारण सदानकदा 'काव काव' करू नका. त्यामुळे 'काक' समाजात तुमचे महत्त्व कमी होते. सर्वांनी सजग राहिलं तर आपले कुणीही वाकडे करू शकत नाही हे लक्षात ठेवा.


**शरीराची निगा राखा:**

स्वतःचे शरीर, पाय, संपूर्ण शरिरावरील पिसे, चोच सगळं कसं स्वच्छ असलं पाहिजे. त्यासाठी स्वतःचे पंख साफ करण्यासाठी भरपूर वेळ द्या. नाष्टापाणी झाल्यावर सकाळच्या कोवळ्या उन्हात बसा. पाठीवर तसेच पंखांवर छान उन्हं घ्या. उन्हात बसून प्रत्येक पीसन पिस साफ करा. देवाने चोच फक्त खायला आणि मारपीट करायला दिलेली नाही हे लक्षात असू द्या. शाकाहारी मांसाहारी सगळे खाऊन झाल्यानंतर चोच पुन्हा पुन्हा घासून पुसून साफ करायला विसरू नका. दररोज आठवणीने पाण्याने आंघोळ करा आणि मग आरामात पंख सुकवून घ्या. त्यामुळे पिसांवर रोगट कीटक तग धरू शकत नाही आणि आपण ठणठणीत राहतो.

**घरात स्वच्छता राखा:**

घरट्याची स्वच्छता अतिशय महत्वाची असते. मुंग्यासारख्या भयंकर शत्रूला अंडी आणि पिल्लांचा सुगावा केवळ घाणीमुळे लागतो हे लक्षात असू द्या. असा सूक्ष्म शत्रू मोठ्या दृष्य





शत्रूपेक्षा जास्त घातक असतो. कधीही घरट्यात वा जवळपास 'शी' करू नका. पिल्लांची विष्ठा अजिबात घरट्यात राहू देऊ नका. खरे तर ती वाया जाऊ नये. म्हणून तीचा सदूपयोग करावा म्हणजे स्वतः खाऊन टाकावी. महत्त्वाचे म्हणजे त्यांना घरट्यात शी करण्याची संधीच देऊ नका. विष्ठा सरळ चोचिने उचलून गिळून टाकावी. पिल्लांची चुळबुळ झाली की लगेच 'वेळ झाली आहे' समजून जावे. स्वच्छता हा आपला नैसर्गिक स्वभाव आहे. त्यासाठी राजकीय काकांनी 'स्वच्छ घरटे अभियान' राबवायची आवश्यकता नसावी. 'पिल्ले ही देवाघरची फुले' असतात हे लक्षात असून द्या. त्यांची विष्ठा काढणे सत्कर्म आहे. (शहरी माणसांचे तत्वज्ञान ह्याच्या उलट आहे. हागणदरीत मोकळ्यावर 'शी'ला जाणे बंद करून त्या लोकांनी घरीच संडास बांधले आहेत).

**बच्चेकंपनीची विशेष काळजी घ्या:**

मोठ्यांवर येणारी संकटे वेगळी असतात. बच्चे कंपनीला संकटांची जाण नसते. उलट त्यांना प्रत्येक गोष्टीचे कुतूहल असते. त्यामुळे त्यांची विशेष काळजी घ्यावी. आजुबाजूच्या प्रदेशात घिरट्या घालणाऱ्या शिकारी पक्ष्यांना आक्रमकपणे दूरपर्यन्त पळवून लावा. शिक्रा, घार, घुबड ह्यांची तर अजिबात हयगय करू नका.

**गोडबोल्यांपासून सावधान रहा:**

कोकिळेसारखे पक्षी खूप छान गातात. ती करमणूक समजून त्याच्याकडे दुर्लक्ष करू नका. त्यांच्या मनात नेहेमी आपल्या जातीबद्दल कटकारस्थान शिजत असते. मिसेस कोकिळा आपल्या घरट्यात घुसायच्या संधीची वाटच बघत असते. ती काय नुकसान करते ते जरी आपल्याला कळत नसले तरी तिला ताबडतोब परिसरातून दूरपर्यंत हुसकावून लावावे. गोडगोड बोलणारे सर्व जण चांगलेच असतात असे अजिबात नाही.

**खेळण्यासाठी वेळ काढा:**

जोराचा हवा सुटली की हवेवर स्वार व्हा आणि मजा लुटा. बस वर बसून प्रवास करा. मित्र कंपनी जमवून आरडा ओरडा करत परिसरात फेरफटका मारा. पहिल्या पावसात चिंब भिजा. हे जीवन एकदाच मिळते.

**माणसांचे निरीक्षण करा:**

लक्षात ठेवा. आपल्याला ह्याच प्राण्यासोबत जगाचे आहे. हा प्राणी बुद्धिमान असून तो क्षणात आपल्यावर वार करू शकतो. सगळ्याच समाजात चांगले आणि वाईट सदस्य असतात. चांगले तसेच वाईट दोघांनाही लक्षात ठेवा. चांगली माणसे तुम्हाला खायला घालतात. वाईट माणसे सदानकदा तुमच्या मागे लागतात. ही मंडळी दुसऱ्यांचा द्वेष करतात. उरलेल्या इतरांना तुमच्याशी काही देणे घेणे नसते. त्यांना स्वतः सोडून ह्या जगात आणखी काही आहे हे सुद्धा माहिती नसते.

इति काक पुराण!!

**डॉ. राजू कसंबे**
**(सहाय्यक संचालक (शिक्षण) – BNHS,**
**बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, मुंबई)**

**फोटो सौजन्य – क्षितिज लोकरे**
**चित्रकार – आरती दुगल**



# INSECTOGRAPHY

**– युवराज गुर्जर**

निसर्गासंबंधित सतत वाचन आणि जंगलातल्या भेटींमुळे पक्षी निरीक्षणात थोडाफार तरबेज झालो. यासाठी एकदा पावसाळ्यात येऊरच्या जंगलात फिरत असताना झाडावर एक भले मोठे फुलपाखरू दिसले. आधी मला ते खोटे आणि प्लास्टीकचे वाटले कारण त्याचा आकार चक्क एक फुट एवढा मोठा होता. थोडे अधिक जवळ जाउन बारकाईने बघितले तेव्हा जाणवले की, ते एक फुलपाखरू नसून ती दोन फुलपाखरांची मिलन जोडी होती आणि हळूहळू हलतही होती. डोळ्यावर विश्वास बसत नव्हता पण जे बघत होतो ते नक्कीच सत्य होते. आम्ही हळूच त्या जोडीला सॅकमधून घरी आणले आणि एका मोठ्या काचेच्या रिकाम्या फिश टँकमधे ठेवले. आता ते फुलपाखरू कुठले आहे ते ओळखण्यासाठी माझी धडपड सुरू झाली. त्यावेळी भारतीय फुलपाखरांवर पुस्तके उपलब्ध नव्हती आणि इंटरनेटचाही प्रसार आपल्याकडे झाला नव्हता. बऱ्याच शोधाअंती बी.एन.एच.एस चे श्री. आयझॅक किहीमकर यांचे तज्ञ म्हणून नाव कळले आणि त्यांना फोन



केला. फोनवरच्या त्या माझ्या फुलपाखराच्या वर्णनावरूनच ते प्रचंड उत्साहीत झाले आणि त्यांनी सांगीतले की ते फुलपाखरू नसून ॲटलास मॉथ हा पतंग आहे आणि तो जगातला सर्वात मोठा पतंग म्हणून गणला जातो. याशिवाय मुंबईमधे बऱ्याच वर्षांच्या काळानंतर तो परत दिसला आहे. त्वरीत स्वत: आयझॅक किहीमकर आणि त्यांचे मित्र सुधीर सप्रे माझ्याकडे आले आणि त्यांनी छायाचित्रे घेतली. मधल्या काळात नर पतंग मरून गेला आणि मादी पतंगाने गुलबट रंगाची ज्वारीच्या दाण्याएवढी १०० एक अंडी घातली. या पतंगांना तोंडाचे अवयवच नसतात आणि प्रौढ अवस्थे मधे फक्त जोडीदार मिळवून मिलन घडवून पुढचा वंश वाढवणे हे एकच काम त्यांना असते. त्यामुळे नर ७/८ दिवसात मरतात तर मादी पुढे अंडी घालून लगेच मरते. या काळात अळी असताना त्यांनी खाल्लेले अन्न त्यांच्या शरीरावर चरबीच्या स्वरूपात साठवलेले असते त्यावर त्यांची गुजराण होते. या प्रकारानंतर माझा फुलपाखरांचा अभ्यास सुरू झाला. पक्षी निरीक्षणाबरोबर हा अजुनच एक वेगळा आनंद होता. अगदी आपल्या घराच्या आसपास, बागांमधे अनेक जातींची, रंगीबेरंगी फुलपाखरे दिसतात पण आपल्याला त्यांच्याबद्दल काहीच माहिती नसते. ही ईवलीशी फुलपाखरे हजारो किलोमीटर स्थलांतर करतात, काही विषारी फुलपाखरे असतात आणि त्यांची नक्कल करणारी बिनविषारी फुलपाखरे सुद्धा असतात हे सर्व काही नविन होते. अर्थात भारतीय फुलपाखरांच्या जातींवर पुस्तके नसल्यामुळे अनेक परदेशी पुस्तकांवरूनच माहिती मिळवली आणि ज्या जाती त्यांच्याकडे आणि आपल्याकडे सुद्धा दिसतात त्यांची थोडीफार ओळख झाली.

दरवेळेला मोठ्या जंगलातच थरारक अनुभव येतात असे काही नाही. माझ्या दर रविवारच्या फेऱ्या कायम येऊर, नागला, कर्नाळा, फणसाड इथे होत असतात. या लहान लहान जंगलात पण दरवेळेस हमखास न चुकता काही ना काही छान



दिसतच राहाते आणि अनेक अविस्मरणीय अनुभव सुद्धा येतात. ज्या फुलपाखरांची आम्ही तासनतास वाट बघतो ती फुलपाखरे चक्क माझ्या कॅमेरावर, हातावरच येउन अनेकदा बसली आहेत. कित्येक वेळा सापांची, विंचवांची अचानक गाठ पडली आहे. ह्या छोट्या छोट्या जंगालातील ह्या सुक्ष्म बारीक किटकांच्याच माझ्या छायाचित्रांना आतापर्यंत देशात, परदेशात जास्त प्रसिध्दी मिळाली आहे. आज जगभरात सबंध प्राणीवर्गात किटकांची संख्या सर्वात जास्त आहे. जंगलातील मोठ्या प्राण्यां / पक्ष्यांबरोबरच तिथे दिसणारे लहान सहान किटक आणि वन्य फुले यांच्याकडे मात्र कायमच दुर्लक्ष झाले आहे. त्यांचे विश्व सुद्धा तेवढेच विस्मयकारी आणि समृद्ध आहे आणि याच कारणा करता या चिमुकल्या किटकांचे छायाचित्रण करायला मी सुरुवात केली. त्यांचे वेगवेगळे प्रकार त्यांच्या वेगवेगळ्या जाती या माझ्या कॅमेरामध्ये बंदिस्त करायचा प्रयत्न केला. प्रत्येक जातीच्या किटकांचे छायाचित्रण करतांना वेगवेगळ्या अधिवासात जाऊन त्यांचे निरीक्षण करणे आणि मग त्यांचे छायाचित्रण करणे याचं मला वेडच लागले.









सुरुवातीच्या काळात अर्थात महागडे कॅमेरे आणि किटकांच्या छायाचित्रांणा करता लागणारी मॅक्रो लेन्स ही पैशा अभावी उपलब्ध नव्हती मग, त्याच्यावर तोडगा काढून अगदी चष्म्याच्या भिंगाचा सुद्धा वापर करून पूर्वी मी छायाचित्र काढली आहेत. नंतर हळूहळू या क्लोजप किंवा मॅक्रो फोटोग्राफी करता लागणाऱ्या अनेक ॲक्सेसरीज यांचा वापर करून मला त्यांच्या अधिकाधिक जवळ जाता आले आणि त्यांचे अतिशय उत्कृष्ट, सूक्ष्म, करकरीत छायाचित्रण करता अले. यासाठी मी पूर्वी क्लोजअप फिल्टर एक्स्टेंशन ट्यूब यासारख्या अनेक ॲक्सेसरीज वापरल्या.

आता मात्र मी प्युअर मायक्रो लेंस माझ्या किटकांच्या छायाचित्रणाकरता वापरतो. ही मॅक्रो लेन्स असल्यामुळे तुम्हाला अतिशय सूक्ष्म किटक सुद्धा चांगल्या रीतीने छायाचित्रण करता येते. त्याचे रंग, त्याचे पोत हे आपल्याला टिपता येतात. या किटकांचे छायाचित्रण करण्याकरता मात्र त्यांचा थोडा अभ्यास नक्कीच जरुरीचा आहे. हे किटक कुठे सापडतात, वर्षाच्या कुठल्या हंगामात ते आपल्याला दिसतात, कुठल्या प्रकारचा अधिवास त्यांना लागतो याची माहिती जर आपल्याला असेल तर जंगलांमध्ये हे किटक आपल्याला दिसणे आणि मग त्यांचे छायाचित्रण करणे हे आपल्याला सहज शक्य होऊन जाते. आपल्या भारतात जैवविविधता ही प्रचंड असल्यामुळे भारतातील वेगवेगळ्या भागातल्या जंगलात जाऊन तिथल्या स्थानिक किटकांचे छायाचित्रण आपल्याला सहज करता येऊ शकते. किटकांच्या काही सवयी जर आपण



जाणून घेतल्या तर त्यांच्या अधिकाधिक जवळ जाऊन त्यांच्या हालचाली, त्यांचे जीवन आपल्याला आपल्या कॅमेरामध्ये टिपता येतात. मग यामध्ये दोन नरांची लढत असेल किंवा नराने मादी करता केलेला नाच असेल ज्याला आम्ही इंग्रजी मध्ये कोर्टशिप डिस्प्ले असे म्हणतात. किटकाची मादी तिच्या पिल्लांची कशी काळजी घेते. ती आपल्याला चांगल्या रीतीने टिपता येउ शकते. ती कशी अंडी घालते, ती त्याच्या करता घरटे कसे बनवते, त्या होणाऱ्या पिल्ला करता खाण्याची तजवीज कशी करून ठेवते हे आपल्याला सहज न्याहाळता येते. मात्र या छायाचित्रणा करता संयम अतिशय जरूरीचा आहे. वन्य आणि निसर्ग छायाचित्रणात तुम्ही कितीही तयार असलात आणि तुमच्याकडे कितीही उच्च दर्जाचे कॅमेराचे



साधन असले तरी समोरच्या किटकाने दर्शनच दिले नाही किंवा तो तिकडून निघून गेला तर तुम्ही काहीही करू शकत नाही. एखादा किटक दिसल्यावर आधी लांबूनच त्यांची छायाचित्रे घेउन मग शरीराच्या कमीत कमी हालचाली करत त्यांच्या जवळ सरकून त्यांची छायाचित्रे घ्यावी. या किटकांचे छायाचित्रण करण्याकरता त्यांच्या पातळीवर जाऊन म्हणजे अगदी जमिनीलगत जाऊन छायाचित्रण करणे हे अतिशय गरजेचे असते त्याला आम्ही आय लेव्हल फोटोग्राफी असे म्हणतो. ही अशी त्यांच्या पातळीवर जाऊन छायाचित्रे घेतली तर त्याचा अँगल हा अतिशय उत्तम आणि दिसण्याकरता चांगला असतो जेणेकरून आपल्याला तो किटक किंवा तो लहान जीव अतिशय चांगल्या रितीने न्याहाळता येतो बघता येतो. सध्या तर या किटकांचे छायाचित्रण करण्याकरता तुम्हाला महागडा डिजिटल एसएलआर आणि मायक्रो लेन्स यांची सुद्धा गरज नाही. आपल्याकडे असलेला स्मार्टफोन हा सुद्धा उच्च प्रतीचा मायक्रो इमेजेस घेऊ शकतो त्याच्याही पुढे जाऊन या मोबाईलचा कॅमेरा करतात ॲडिशनल मायक्रो ॲक्सेसरीज सुद्धा आपल्याला मिळू शकतात. या मायक्रो ॲक्सेसरीज मोबाईल कॅमेराला लावून तुम्ही किटकाच्या किंवा फुलांच्या अतिशय जवळ जाऊ शकता आणि अगदी सहज त्यांचे छायाचित्रण करू शकता. चला तर मग या किटकांच्या रंगीबेरंगी आणि विस्मयकारी जीवनाची सफर करुया, अर्थात सोबत छायाचित्रण सुद्धा करुया !!!

**युवराज गुर्जर**
**(प्रसिद्ध वन्यजीव छायाचित्रकार व अभ्यासक)**
**www.yuwarajgurjar.com**

# आठवणी राजमाचीच्या

**– श्रीरंग वैद्य**

राजमाचीचा खरा ट्रेक राजमाची उतरतांना आहे.

एका वर्षी इतका पाऊस झाला की नेहमीच्या वाटा पार बदलून गेल्या. ..

६० लोक होते तेव्हा ट्रेकला

रविवारी दुपारी जेवण करून आम्ही राजमाची उतरायला सुरुवात केली. पाऊस प्रचंड कोसळत होता ८०% आपण उतरून आलो. ..आता फारतर अर्ध्या तासात आपण आपल्या रिक्षा जिथे उभ्या होत्या तिथे ...

आणि अचानक एक किस्सा झाला...

उतरतांना मध्ये गॅप सोडू नका हे बजावून पण गॅप पडली... आपल्या ४५ लोकांचा ग्रुप पुढे आणि १५ लोकांचा ग्रुप पाठी पडला...

पुढचा ग्रुप अंधार पडण्याच्या जेमतेम आधी खाली पोहोचला मागचा ग्रुप मात्र अंधार पडल्यामुळे रस्ता जवळपास चुकलाच आपल्या ट्रेक ला नेहमीच पुढे आणि शेवटी ट्रेकला आधी जाऊन आलेले मेम्बेर्स असतात मात्र त्या वर्षी पाऊस भरपूर पडल्याने नेहमीचे रस्ते पार बदलले होते आणि अनेक फसवे रस्ते तयार झाले होते मागच्या ग्रुपने एक फार चांगला निर्णय घेतला तो म्हणजे अजून वाट चुकण्या पेक्षा पाठी जाउन मगाशी लागलेल्या कोंढाणा लेण्यांन मध्ये बसणे आणि मदत मागवणे इथे २-३ लोकांना पाठी मागच्या ग्रुप साठी ठेऊन आम्ही सर्व रिक्षात बसून कर्जतला आलो पण ट्रेकच्या इतक्या शेवटी शेवटी अस काही होईल याची कुणीच कल्पना केली नव्हती. यात अजून एक किस्सा म्हणजे मागे राहिलेल्या २-३ लोकांकडे फोन नाही आणि पुढे आलेल्या लोकांकडे फोन आम्हाला मेसेज मिळाला की आपले १५ लोक मागे राहिले असून कोंढाणा लेण्यां मध्ये बसले आहेत. शेवटी रिक्षा वाल्या कडून गावातला फोन घेतला, खाली आलेल्या आमच्या २-३ लोकांना हा मेसेज दिला आणि त्यांनी गावकऱ्यांच्या मदतीने १५ लोकांना अंधारात खाली गावात आणलं इथे कर्जतला आम्ही सर्वांना मिळेल त्या गाडीने मुंबईस रवाना केलं आणि कधी एकदा आपली मंडळी येत आहेत याची वाट बघायला लागलो.. या सर्व गोंधळात इतका वेळ गेला की कर्जत वरून मुंबईला जाणारी शेवटची लोकल निघून गेली. आता कर्जतला असणार्या आम्हाला आमची आणि येणाऱ्या १७-१८ लोकांच्या जेवणाची व्यवस्था करायची होती. शेवटी भुर्जी पाव ची गाडी देवासारखी धावून आली, भरपूर भुर्जी पावची ओर्डर दिली आमचे लोक कर्जतला आल्यावर सर्वात आधी सर्वांनी घरी फोन करून झालेला प्रकार सांगितला आणि पहिल्या लोकल घरी येतो असा सांगितलले त्यामुळे घरचे पण निर्धास्त झाले आणि इथे आम्ही सर्वांनी भुर्जी पाववर मस्त आडवा हात मारला आणि कर्जत स्टेशनवर फुलटू दंगा घातला.

---------

बघतो तर काय खरच ती झाडाची काडी रेडीअम सारखी चमकत होती.

राजमाचीला ज्योतीवंती वनस्पती दिसते अस बर्याच जणांच्या तोंडून ऐकलं होतं एका वर्षी मनाशी पक्क ठरवलं की काहीही झालं तरी ही वनस्पती बघायचीच.

दिवसभर लोणावळा ते राजमाची अस भरपूर चालल्यामुळे त्या रात्री जेवण झाल्यावर बरेच जण लगेच ढाराढूर झोपून गेले. आम्ही काही मंडळी आधीच ठरवल्या प्रमाणे राजमाचीला ज्यांच्या घरी आपण नेहमी राहतो त्या राजाराम उंबरे काकांना गुपचूप जाऊन भेटलो आणि आम्हाला ती अदभुत ज्योतीवंती वनस्पती बघायचीच आहे असं सांगितल. काका लगेच तयार झाले. हातात टॉर्च घेऊन आम्ही ४-५ जण अंधारात काकांच्या मागे जंगलात निघलो. बऱ्यापैकी जंगलात आल्यावर काकांनी सांगितलं की आता तुमच्या जवळच्या टॉर्च बंद करा आणि बघा काही दिसत का?

टॉर्च बंद केल्या बरोबर भयानक अंधार पसरला, डोळ्या समोर बोटभर अंतरावरच पण दिसत नव्हतं काका म्हणाले चला थोडं पुढे जाऊन बघू तसच अंदाजाने धडपडत पुढे जायला निघालो काही अंतर पुढे गेल्यावर काका एकदम थांबून म्हणाले ती बघा ! दिसली का ?
आम्हाला



काहीच दिसत नव्हतं. काकांनी एक झाडाची काडी उचलली आणि आमच्या समोर धरली. बघतो तर काय खरच ती झाडाची काडी रेडीअम सारखी चमकत होती, हिरवा प्रकाश त्यातून बाहेर पडत होता. आमचा आमच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. एक अदभूत गोष्ट आम्ही चक्क आमच्या हातात घेऊन बघत होतो पुढच्या वर्षी परत जेव्हा राजमाचीला जायचे आणि हि वनस्पती बघण्याचा योग आला तेव्हा तर पूर्ण झाडच्या झाड चमकत होतं नक्की झाड चमकत होत कि अजून काही हे गुपित, त्याच्या पाठची scientific माहिती राजमाचीला गेल्यावर सांगेन...

**Photo Credit: Google**



# AMAZING FACTS

**आपला राष्ट्रीय प्राणी वाघ ...**

- वाघ हा अतिउच्च दर्जाचा शिकारी असला तरी वाघाला एक शिकार मिळवायला सरासरी २० प्रयत्न करावे लागतात. आणि हे प्रयत्न करतांना जंगलातले अनेक प्राणी विशिष्ट आवाज काढून त्याच्या अस्तित्वाची जाणीव इतर प्राण्यांना करुन देत असतात. याला म्हणतात अलार्म कॉल. हरीण, सांबर आणि माकड वाघ दिसल्यावर एक विशिष्ट प्रकारचा अलार्म कॉल देतात.
- नागपूरच्या उमरेड कऱ्हांडला अभयारण्या मधला जय वाघ २०१५ साली भारतातला सर्वात मोठा वाघ ठरला होता.
- पूर्ण वाढ झालेला हत्ती सोडला तर वाघ कोणत्याही जमिनीवरील प्राण्याची शिकार करण्यास समर्थ आहे.
- सहसा वाघ हत्तीवर हल्ला करत नाही मात्र आसाम मधल्या काझीरंगा अभयारण्यात एका वाघाने हत्तीवरील माहूतावर हल्ला केला होता.



**रेखा चित्रकार – सीमा अमित**



Constable
छायाचित्रकार: अभिजीत येवले



निल रूईकर
Blue Tiger
छायाचित्रकार: महेंद्र गोवेकर



केशरटोक्या
Crimson Tip
छायाचित्रकार: महेंद्र गोवेकर

# निसर्गाची रंगपंचमी - फुलपाखरू

- अंगभर रंगपंचमी खेळलेल्या ह्या सुंदर जीवांचे निरीक्षण हे बाळगोपाळांसाठी मनोरंजक व सृजनशील तर ठरू शकतेच पण मोठ्यांनाही तणाव मुक्त करू शकते.

- भारतात फुलपाखरांच्या एकुण १५०० प्रजाती आढळतात. महाराष्ट्रात आढळणाऱ्या २३० प्रजातींपैकी १५० प्रजाती मुंबई शहरातंच पाहायला मिळू शकतात.

- महाराष्ट्र हे भारतातील पहिलेच असे राज्य आहे ज्याने राज्य फुलपाखरू घोषित केले आहे. हा मान 'ब्लू मोर्मोन' या प्रजातीने २२ जून, २०१५ रोजी पटकावला.



निलवंत
Blue Mormon
छायाचित्रकार: संजय लोकरे



छोटा चांदवा
Danaid Eggfly Male
छायाचित्रकार: महेंद्र गोवेकर



Queen Of Spain Fritillary
छायाचित्रकार: अभिजीत येवले



बिट्टी
Common Leopard
छायाचित्रकार: महेंद्र गोवेकर

# चांदवड टाकसाळ - एक ऐतिहासिक मागोवा

– मेघन पेटकर

इतिहासाला बोलते करणाऱ्या साहित्यांमध्ये ऐतिहासिक दस्तावेज, ऐतिहासिक पत्रे , वेगवेगळ्या गावातील कुलकर्णी अथवा देशपांड्यांच्या तंट्यांचे निवाडे अथवा महजर ह्यांचा समावेश होतो.अर्थात हे सर्व प्रकार कागदपत्रांच्या अथवा हस्तलिखितांच्या प्रकारात मोडतात परंतु ह्याचबरोबर जेव्हा आपण शिलालेख, ताम्रपट तसेच विविध ऐतिहासिक वास्तू पाहतो तेव्हा त्यांचा सुद्धा ऐतिहासिक पुरावा म्हणून काही अपवाद वगळता विचार करावा लागतोच आणि कुठल्याही राज्यव्यवस्थेचा तसेच महसुलाचा जेव्हा अभ्यास केला जातो तेव्हा त्यामध्ये नाणी, त्यांची परिमाणे आणि त्या संबंधी असलेल्या नोंदींचा म्हणजे चलनव्यवस्थेचा समावेश होतो. प्रस्तुत लेखात मी चलनव्यवस्थेचा भाग असलेल्या टांकसाळीबद्दल बोलणार आहे.

टांकसाळ म्हणजे अशी जागा जिथे नाणी पाडली जातात. थोडक्यात कच्च्या धातूपासून (चांदी, सोने, पंचधातू ) ते सुबक अशा रेखीव गोल नाणे तयार करण्यासाठीचा छोटेखानी कारखाना म्हणजे टांकसाळ. सध्या आपल्या मुंबईत फोर्ट भागात भारतीय रिझर्व बँकेच्या मुख्यालयाजवळ नाणी पाडण्याची टांकसाळ आहे. मी नुकतीच चांदवड किल्ल्याला भेट दिली तेव्हा तेथील टांकसाळीचे अवशेष पाहिले आणि बऱ्याचदा वाचनात चांदवडी रुपया हा उल्लेख आल्याने मी टांकसाळीबद्दल ऐतिहासिक माहिती शोधली आणि काही महत्वाच्या बाबी समोर आल्या त्या मी संक्षिप्त रूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

चांदवड अथवा चांदोर हे नाशिक पासून ६४ किलोमीटर अंतरावर असलेलं तालुक्याचे ठिकाण आहे. प्राचीन काळात नाशिक-सुरत, अथवा दिल्ली - नाशिक हा मार्ग चांदवड वरून जात असल्याने ह्या मार्गाला व्यापारी दृष्ट्या खूप महत्व होते. त्यातच गुलशनाबाद अर्थात नाशिक हे मुख्य ठिकाण इथून जवळ असल्याने भोगोलिक दृष्ट्या हा मार्ग कुठल्याही राजकीय शाही लाअत्यंत महत्वाचा होता. त्यासाठीच चांदवडचा किल्ला हा प्राचीन काळी बांधण्यात आला ज्याचा उल्लेख चंद्रादित्यपुर असाही सापडतो. चांदवड किल्ल्यावरच माचीच्या खाली चांदवड टांकसाळ आपल्याला आजही पाहायला मिळते. किल्ल्यावर ४० X ३० फूट उंचीची टांकसाळीची इमारत म्हणून एका पडीक वास्तूचे अवशेष दाखवले जातात.

ह्या टांकसाळीचा जन्म पेशवाईच्या काळातच झाला असावा असे एकंदरीत ऐतिहासिक संदर्भांवरून समजते. इ.स १७५० साली मल्हारराव होळकरांना चांदवडची सरदेशमुखी अहमदशाह बहादूर याने बहाल केली. त्यानंतर साधारण इ.स १७५९ ला एका ब्राह्मणास टांकसाळ स्थापण्याचा परवाना देऊन ही टांकसाळ सुरु केली गेली. पुढे १७६९ सालच्या अगोदर टांकसाळ पुन्हा बंद झाली परंतु तुकोजी होळकरांनी माधवराव पेशव्यांकडून परवाना मिळाल्यावर पुन्हा ती चालू केली. ह्या परवान्याविषयी माधवराव पेशव्यांच्या रोजनिशीत दिलेली माहिती अशी –

चांदवड येथे खरा माल होत नसल्याने ही टांकसाळ बंद केली गेली व ती पुढे तुकोजी होळकरांच्या विनंतीवरून सुरु केली (सन १७७२-१७७३). परंतु ह्या टांकसाळीचा खर्च सरकारातून द्यावयायचा नाही असे ठरले. टांकसाळीस लोखंड, कोळसे, खार, चिंच लागत असे.

हि टांकसाळ थेट इ.स १८०० पर्यंत किल्ल्यावर आज जिथे टांकसाळीची जागा आहे तिथेच चालू होती परंतु नंतर इ.स १८०० सालीच टांकसाळीच्या अधिकाऱ्यांमध्ये मतभेद झाल्याने टांकसाळ चांदवड शहरात स्थलांतरित करण्यात आली. पुढे १८२९ पर्यंत टांकसाळ अगदी सुरळीतपणे चालू होती नंतर मात्र १८२९ साली चांदी व १८३० साली ताम्र नाणी पाडण्याचे काम बंद करून टांकसाळ कायमची बंद करण्यात आली.

हा झाला एकंदर टांकसाळीच्या वापरात असण्याचा इतिहास, आता ह्या टांकसाळीत कुठली नाणी पाडली जात त्याचा आढावा घेऊयात. चांदवड टांकसाळीत चांदीची नाणी आणि ताम्र अर्थात तांब्यांची नाणी पाडली जात. ह्या टांकसाळीत पाडल्या जाणाऱ्या नाण्यांना चांदवडी रुपया आणि चांदवडी अधेल्या म्हणत. चांदवडी नाणे अथवा रुपया हे त्या काळी खूप प्रसिद्ध होते. प्रामुख्याने ही नाणी पुणे, वाफगाव ह्या भागात जास्त व्यवहारात आणली जात आणि त्याचे मुख्य कारण होते ते म्हणजे ह्या नाण्यांचे धातू.

चांदवडी नाणे एवढे प्रसिद्ध होते की नाण्यांचा अभ्यास करणारा प्रिंसेप ह्याच्या मते ह्या प्रकारची नाणी ग्वाल्हेर संस्थानात पाडली जात. तसेच प्रिंसेप पुढे असेही म्हणतो की नाशिक येथील जरीपटका रुपये सुद्धा चांदवडी रुपयाचे अनुकरण आहे.



चांदवडी रुपयाच्या लोकप्रियतेमुळे व त्याचा पुरवठा व्यापार करताना कमी होऊ नये ह्या साठी चाकण परिसरात एक नवीन टांकसाळ सुरु करण्यात आली आणि टांकसाळ चालवणाऱ्यास स्पष्ट आदेश देण्यात आले कि चांदवडी रुपयासारखाच रुपया व तेवढ्याच शुद्धतेचा धातू असावा. आणखी काही ऐतिहासिक संदर्भ बघता तत्कालीन इ.स १७६५-६६ सालच्या पावतीप्रमाणे त्र्यंबकच्या किल्ल्याचा अधिकारी रामसिंग नरसिंह तुळपुळे यांस एक १,००,००० रुपये पाठवले गेले त्यात ५००० चांदवडी नाणी आणि १००० अधेल्या होत्या. अबॉटने Bombay Gazetteer चा संदर्भ देऊन चांदवड टांकसाळीत नाणे कसे पाडले जायचे त्याची माहिती दिलीय ती पुढील प्रमाणे.

सर्वात पहिले थोडी थोडी ठराविक प्रमाणातली चांदी कारागिरांकडे दिली जाई त्याचे नंतर समांतर तुकडे हे कारागीर करत व त्यानंतर त्याला गोलाकार आकार देऊन त्याचे वजन केले जात. वजन आणि आकार समप्रमाणात असावा ह्यासाठी प्रत्येक कारागिराला वजन व मापे दिली जात. टांकसाळीत ४०० कामगार होते आणि त्यांच्याकडून बनविलेल्या तुकड्यांचे आठवड्यातून एकदा व्यवस्थापकाकडून परीक्षण केले जाई. हे सर्व झाले की पुढे ठसे उमटवण्यासाठी नाणे पुढे पाठवले जाई. ठसे उमटवण्यासाठी एक ठसा लाकडात पक्का बसवला जाई त्याला मध्ये खोल खड्डा असे ज्यामध्ये अक्षर वाटिका कोरलेली असत. चांदीचे गोल तुकडे खोल खड्ड्यात टाकले जात व दुसरा कारागीर वरचा ठसा त्यावर टाकत आणि मग तिसरा कारागीर ६ पाउंड वजनाच्या हातोड्याने मारा करत. अशाप्रकारे ३ माणसे एका तासात २००० नाणी पाडत असत. ह्यामध्ये वापरण्यात येणारा ठसा हा नाण्यांपेक्षा किंचित मोठा असे म्हणून अक्षरं कधीकधी व्यवस्थित उमटत नसत. पाहिलंत ना किती व्यवस्थित प्रकारे काम चालत असे त्याकाळी ते..!. तसेच १८०० साली टांकसाळीतून दहा तासांत २०००० नाणी पाडण्याची क्षमता होती. ह्या काळात ०.२५ टक्के चांदीवर कर आकारला जाई पुढे हाच कर १८२० साली ०.५२ टक्के झाला. ह्या नाण्यांचे वजन श्री बलसेकर ह्यांच्या प्रबंधात दिल्याप्रमाणे ५.५० ग्रॅम ते ११.१ ग्रॅम इतके भरते व हे वजन प्रिंसेप ने दिलेल्या सूचीप्रमाणे १७१. १० ग्रेन्स म्हणजे अर्थात ११.०९ ग्रॅम हिच्याशी जुळते. टांकसाळ हा मराठ्यांचा चलन व्यवस्थेतच अभ्यास करण्याकरता खूप मोठा विषय आहे. तूर्तास इथे फक्त चांदवड टांकसाळीचा व त्यात पाडल्या जाणाऱ्या नाण्यांविषयी माहितीचा मी उहापोह केला आहे. भविष्यात असेच कागदपत्र तपासून आपण आणखी मराठ्यांची चलन व्यवस्था आणि नाणी पाडण्याचे व्यवस्थापन अभ्यासू शकतो.



**संदर्भ ग्रंथ सूची-**

- चांदवड टांकसाळीवर लिहिताना मी माझ्या लेखात प्रामुख्याने आधार घेतला तो श्री.दिलीप प्रभाकर बलसेकर ह्यांच्या प्रबंधाचा व प्रबंधात दिलेले काही ऐतिहासिक संदर्भ मी सुद्धा स्वतः तपासून त्या ऐतिहासिक संदर्भांची छायाचित्रे खाली दिली आहेत.
- संदर्भ ग्रंथांची नावे

पेशवेकालीन महाराष्ट्रातील टांकसाळी, त्यांचे व्यवस्थापन आणि नाणी- श्री.दिलीप प्रभाकर बलसेकर

प्रबंध वाचण्यासाठीची लिंक- https://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/152340?mode=full

- Selections from the Satara Rajas and the Peshwa's Diaries, VII, Peshwa Madhavrao I.,Vol. II अर्थात थोरले माधवराव पेशवे ह्यांची रोजनिशी (पृष्ठ २९९ ,३०५)
- Rev. J. E. Abbott, A Preliminary studies of the Shivaraj or Chhatrapati copper coins J.B.B.R.A. S. vol. 20,1998, pp. 109-130.
- Essays On Indian Antiquities Vol.ii James Prinsep page 54-56




१५. टांकसाळ व नाणें. ३०५

७२६ ( ७११ ). तुकोजी होळकर यांचे नांवें सनद कीं, तुम्हांकडील विठ्ठल गणेश कारकून यांनीं पुण्याचे मुकामीं येऊन विनंती केली कीं, कसबे चांदवड परगणे मजकूर येथें टांकसाळ होती. तेथें माल खरा, तोल पुरा रुपया पडत नव्हता. सबब सरकारांतून टांकसाळ बंद केली आहे, त्यास वरकड जागा टांकसाळेचा बंदोबस्त सरकारांतून करून दिला आहे, त्या रवेसीनें कसबे मजकूरचे टांकसाळीचा बंदोबस्त करून देऊन टांकसाळ चालवावयास आज्ञा जाहली पाहिजे म्हणोन; त्याजवरून किल्ले दौलताबाद येथें सरकारांतून टांकसाळ चालत आहे, त्या शिरस्तेप्रमाणें कसबे मजकुरीं टांकसाळ चालविण्यास आज्ञा केली. त्याविषयीं कलमें.

इ० स० १७७२।७३.
सलास सबैन मया व अलफ.
सफर २७.

१ टांकसाळसंबंधें कारीगारांस मजुरा व किरकोळ जिन्नस लोखंड, कोळसे, खार, चिंच वगैरे लागेल तो व शिबंदी खर्च देखील सरकारांतून द्यावयाचा नाहीं. टंकसाळेचे उत्पन्नापैकीं खर्च करावा. येणेप्रमाणें कलम.

तुकोजी होळकरांना चांदवड टांकसाळ सुरु करण्यासंबंधी दिलेली सनद व आदेश (थोरले माधवराव पेशवे ह्यांची रोजनिशी (पृष्ठ ३०५)


*Method of Coining.*

The *Bombay Gazetteer* on Nasik, page 429, gives a description of how coins were made at the Chandor mint, which was closed in 1830.

" A certain quantity of silver of the required test was handed over to each man who divided it into small pieces, rounded and weighed them, greater care being taken that the weights should be accurate than that the size should be uniform. For this purpose scales and weights were given to each of the 400 workmen, and the manager examined them every week. When the workmen were satisfied with the weight of the piece, they were forwarded to the manager who sent them to be stamped In stamping the rupee an instrument like an anvil was used. It had a hole in the middle with letters inscribed on it. Piece after piece was thrown into the hole, the seal was held on it by a workman called batekari, and a third man gave a blow with a six pound hammer. Three men were able to strike 2,000 pieces an hour, or 20,000 in a working day of ten hours. As the seal was a

जे. अबॉट ह्याच्या ग्रंथातील चांदोर अर्थात चांदवड टांकसाळ व त्यातील नाणे पाडण्याच्या पद्धतींबद्दलचा उल्लेख ( Rev. J. E. Abbott, A Preliminary studies of the Shivaraj or Chhatrapati copper coins, J.B.B.R.A. S. vol. 20,1998, page 122.)


चांदवड टांकसाळीचे अवशेष

# Unlock Trek 1.0/
# लॉकडाऊन नंतरची भटकंती

– राहुल मेश्राम
(ट्रेकक्षितिज संस्था, MMRCC)



कोविड वाहकांमुळे कोरोनाचा प्रादुर्भाव जगभरात होत आहे. अश्या परिस्तिथीत असिम्टमॅटीक ट्रेकर्समुळे हा रोग ग्रामीण भागात पसरू नये या करीता सध्यातरी भटकंती करणे टाळणे योग्य ठरेल. करोनामुळे घरात बसून असलेल्या ट्रेकर्सना आता किल्ले-डोंगर भटकंतीचे वेध लागले आहेत. पण सध्या राज्यात लागू असलेले लॉकडाऊन संबंधी निर्बंध हटविले व स्थानिक अधिकाऱ्यांनी ट्रेकिंगची परवानगी दिली तरच भटकंती करता येऊ शकेल. भटकंती दरम्यान आपण भेट देणाऱ्या भागातील ग्रामस्थांची सुरक्षा व मानसिकता याचा विचार करता, शासनाने जाहीर केलेल्या सर्व नियमांचे पालन करून तसेच योग्य ती खबरदारी घेऊन भटकंती करणे उचित ठरेल. अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघ ही महाराष्ट्रातील पर्वतारोहण क्षेत्रातील सरकारमान्य शिखर संस्था आहे. AMGM निर्मित 'लॉकडाऊन नंतरचे गिर्यारोहण' या महत्वाच्या Webinar Series मध्ये आपल्या देशातील व परदेशातील काही जाणते गिर्यारोहक, जंगलतज्ञ, निसर्ग अभ्यासक, कायदेतज्ञ व इतर मान्यवरांनी या संबंधातील त्यांचे विचार मांडले आहेत. या उपक्रमात समन्वयकाचे काम करतांना मान्यवरांकडून मिळालेल्या मार्गदर्शनावर आधारित, लॉकडाऊन नंतरच्या भटकंतीसाठी संयोजक – संस्था / सहभागी व्यक्ती यांच्या करीता काही मार्गदर्शक सूचना पुढे मांडत आहे...

**भटकंती आधी**

१) शासनाने वेळोवेळी दिलेल्या सर्व नियमांचे पालन करावे

२) फक्त नोंदणीकृत संस्था अथवा संयोजक यांच्या सोबत सहभाग घ्यावा.

३) ज्या ठिकाणी ट्रेक करीता आपण जाणार आहात ती जागा बाहेरील व्यक्तींना भेट देण्या करिता खुली आहे का व त्या भागात कोरोना संदर्भातील काही निर्बंध लागू आहेत का याची माहिती करून घ्यावी.

४) शक्य असेल तर प्रवासा करिता फक्त खासगी वाहनच वापरावे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर टाळावे व प्रवासा करिता आवश्यक त्या सर्व सरकारी परवानग्या घ्याव्यात.

५) जिथे नेहमीच गर्दी असते अशी ठिकाणे टाळावीत, त्याऐवजी ऑफबीट व कमी लोक जाणाऱ्या जागा निवडाव्यात.

६) सहभागींची संपूर्ण माहिती व वैद्यकीय प्रमाणपत्र संस्थेने / आयोजकाने घेणे गरजेचे आहे.

७) गटाचा आकार लहान ठेवावा व सहभाग घेण्या करीता वयोमर्यादा किमान १५ ते ५५ वर्षे अशी असावी.

८) सहभागी व्यक्ती कंटेनमेंट झोनमध्ये वास्तव्यास नसावी व गेल्या २ आठवड्यात कोविड पॉसिटीव्ह असलेल्या कोणत्याही व्यक्तीशी त्याचा संपर्क आलेला नसावा

९) भटकंतीला जाण्यापूर्वी सहभाग घेणारी व्यक्ती अशक्तपणा, ताप, कोरडा खोकला, अंगदुखी व श्वास घेण्यास त्रास होणे यासारख्या लक्षणांनी ग्रस्त असेल तर अश्या व्यक्तीला ट्रेकमध्ये सहभागी करु नये.

१०) ट्रेकच्या १ आठवडा आधी संयोजक संघ सदस्य व सहभागी यांची वैद्यकीय तपासणी व्हावी.

११) भटकंती करीता नाव नोंदणी करीत असताना आपली खरी वैद्यकीय माहिती आयोजकांना द्यावी.

१२) शासनाने सक्तीचे केलेले आरोग्यसेतु ऍप प्रत्येक सहभागी व्यक्तीच्या मोबाईल मध्ये स्थापित असावे.

१३) संस्था / आयोजकांकडे इन्फ्रारेड तापमापक, पल्स ऑक्सीमीटर, हॅन्ड सॅनिटायझर, मास्क, हातमोजे, इत्यादी वस्तू प्रथमोपचार पेटी व्यतिरिक्त आपल्या सोबत ठेवणे अनिवार्य आहे.

१४) प्रत्येक सहभागी व्यक्तीने स्वतःची व्यक्तीगत साधने वापरावीत. त्यामध्ये प्रामुख्याने हॅन्ड सॅनिटायझर, मास्क, हातमोजे, टोपी, पूर्ण बाहींचा टी-शर्ट, फुल पॅन्ट, कप, ताट, पाण्याची बाटली, इत्यादी असावे.

१५) लॉकडाऊनच्या काळात किल्ले / डोंगरात मानवी हस्तक्षेप कमी झाल्यामुळे अशा ठिकाणी भटकंती दरम्यान मोकळेपणाने वावरत असलेले वन्यजीव अचानक समोर येण्याची शक्यता खूप आहे. त्यामुळे ट्रेक सुरु करण्याआधी सावधगिरी बाळगा व स्थानिकांकडून त्या ठिकाणाची पूर्ण माहिती करून घ्या.

१६) शक्य असल्यास सहभागी व्यक्तीचे किंवा गटाचा विमा / मेडिक्लेम पॉलिसी घ्यावी.

**भटकंती दरम्यान**

१) आयोजक चमू कडे संपूर्ण वेळ वैद्यकीय सहाय्यक व प्रथमोपचार पेटी उपलब्ध असणे बंधनकारक आहे.

२) संस्था / आयोजक यांनी ट्रेकला निघण्यापूर्वी सर्व सदस्य, सहभागी व वाहन चालक यांचे थर्मल गन आणि पल्स ऑक्सिमीटरने तपासणी करावी.

३) वाहनाने प्रवासावरील बंधने शासन नियमानुसार सर्वांसाठी असतील तशीच असावीत.

४) आपण प्रवास करीत असलेले वाहन, प्रवास सुरु करण्याआधी योग्य प्रकारे निर्जंतुक केले गेले आहे हे सुनिश्चित करावे.

५) शक्यतो वाहनात आसन क्षमतेपेक्षा ५० टक्के लोकांनीच प्रवास करावा / प्रत्येक आसनावर एकच व्यक्ती असावी.

६) वाहनात आपल्या बसण्याच्या आसनावर एक टॉवेल किंवा चादर वापरावे.

७) जर भटकंतीच्या ठिकाणी खूपच गर्दी असेल तर पुढे न जाता तिथून परत येणे योग्य ठरेल

८) स्थानिकांशी कमीतकमी संपर्क ठेवावा, तसेच त्यांच्या कडून काहीही खरेदी करणे अथवा देणे टाळावे.

९) आपले वाहन गावा बाहेर पार्क करा व जमल्यास भटकंती सुरु करण्यासाठी गावा बाहेरुन जाणारा मार्ग निवडावा.

१०) ट्रेकचे मार्ग दाखविण्यासाठी अथवा मदतीसाठी जर स्थानिक वाटाड्या सोबत घेत असाल तर त्यांना मास्क व सॅनीटाईझर द्यावा.

११) ट्रेक मधील प्रत्येक सदस्याने भटकंती दरम्यान मास्क वापरणे बंधनकारक असेल.

१२) ट्रेक दरम्यान सर्व सदस्यांनी एकमेकांमध्ये पुरेसे अंतर राखून चालावे.

१३) सर्व सदस्यांनी भटकंती दरम्यान वैयक्तिक आणि सामाजिक स्वच्छतेचे नियम पाळावे.

१४) शक्य असेल तर नेहमी घरगुती अन्न सोबत न्यावे, बाहेरील पदार्थ खाणे टाळावे.

१५) खोकताना किंवा शिंकताना आपले तोंड आणि नाक झाकून ठेवा, तसेच खोकला किंवा शिंक आल्यास काय करावे याचे प्रात्यक्षिक आयोजकांनी दाखवावे.

१६) ट्रेकच्या मार्गावर लघवी करू नका, लघवीसाठी जायचं असेल तेव्हा मुख्य वाटेपासून दूर अंतरावर जा.

१७) कोणत्याही कुंड किंवा टाक्यामधून पाणी काढून घेण्यासाठी फक्त एकाच स्वच्छ सॅनीटाइस्ड बाटलीचा वापर करा.

१८) नियमित वेळेच्या अंतराने ट्रेकमधील प्रत्येक सदस्याच्या शरीराचे तपमान आणि ऑक्सिझनची पातळी तपासावे.

१९) जेवणापूर्वी आपले हात साबणाने / सॅनीटाईझरने स्वच्छ करावे.

२०) आपल्या ट्रेकच्या सदस्यांसोबत अन्न किंवा पाणी सामायिक करू नका तसेच एकाच प्लेटमधून खाऊ नका किंवा दुसऱ्याची पाण्याची बाटली वापरू नका.

२१) जर गावातील व्यक्तीकडून अन्न पदार्थ तयार करुन घेणार असाल तर सामाजिक अंतर राखून ते अन्न आपण सोबत आणलेल्या साहित्या मध्ये घ्या.

२२) शक्यतो रात्रीच्या मुक्कामासाठी मंदिरे, लेणी, शाळा, गावकऱ्यांची घरे, इत्यादी ठिकाणे टाळा. त्या ऐवजी स्वतःचा तंबू वापरा.

२३) मुक्काम करण्यापूर्वी आणि ठिकाण सोडण्यापूर्वी आपल्या वास्तव्याची जागा सॅनीटाईझ करून घ्या.

२४) रात्री झोपताना एकमेकांमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे. जर जागा छोटी असेल व तुलनेने सदस्य जास्त असतील तर अश्या वेळी रात्री झोपतांना क्रॉस पद्धतीने झोपावे, म्हणजे आपल्या डोक्याजवळ शेजारी झोपणाऱ्याचे पाय असं एका नंतर एक झोपावे.

२५) शौचासाठी छोटा फावडा वापरून खड्डा खणावे व शौचानंतर मातीने खड्डा बुजवून टाकावा.

२६) भटकंती दरम्यान कोणत्याही कुंड, तलाव किंवा टाक्यामध्ये पोहू नका.

२७) नियमित वेळेच्या अंतराने आपण सोबत आणलेले / वापरलेले सर्व साहित्ये निर्जंतुक करावीत.

**भटकंती नंतर**

१) ट्रेकवरून घरी आल्यानंतर पुढील २ आठवडे कोविड संदर्भित लक्षणांसाठी स्वतःचे निरीक्षण करावे.

२) भटकंती दरम्यान योग्य खबरदारी घेतल्यानंतर देखील ट्रेक नंतर २ आठवड्यांच्या आत दुर्दैवाने आपल्याला कोविडची लागण झाल्यास कृपया ट्रेक संयोजकांना व ट्रेकमधील सदस्यांना त्वरित कळवावे.

मित्रांनो, या सर्व सूचनांचा वापर आपण तेव्हाच करू शकता जेव्हा सरकार द्वारे साहसी पर्यटन / भटकंती सुरु करण्या बाबत परवानगी देण्यात येईल. तसेच या संदर्भात शाशनाद्वारे दिलेली नियमावलीच अंतिम आणि सर्वांवर बंधनकारक असेल याची नोंद घ्यावी.

**चित्रकार – सुरेखा कोल्हाळ**



# आमचे मामा...

– ऋषिकेश मोटे

ट्रेक करताना बऱ्याच वेगवेगळ्या व्यक्ती भेटत असतात, त्यातलेच हे आम्हाला राजधेरवाडी मध्ये भेटलेले मामा. मामा आमच्या सोबत गाईड म्हणून आले होते. हे मामा म्हणजे पुलंच्या लेखणीतून आलेल्या ऑर्डरली साहेबांचे एकदम डिट्टो कॉपी. जड चेहरा आणि तितकाच जड आवाज, एक साधा शर्ट आणि पँट, पायात रबरी बूट, एका हातात निळी पिशवी आणि दुसऱ्या हातात काठी आणि अश्या या व्यक्तिमत्वाला साजेल असा तोरा.




जसे ऑर्डेरली साहेब कोणत्याही प्रश्नच उत्तर साहेब... आम्हाला आमच्या लाईन प्रमानं जाऊ द्या! असं द्यायचे तसं आमचे मामा पण आम्ही काही विचारलं की एकच उत्तर द्यायचे उदाहरण आम्ही विचारलं मामा इथून कोळधेर दिसतो का?, मामा ही समोर डोंगर रांग दिसते ती कोणती? इत्यादी इत्यादी प्रश्नाची उत्तरे, मामा, एकाच चालीवर त्यांच्या जड आवाजात देत ''हे बघा, तिथं वर गेल्यावर मी तुम्हाला समदं सांगतो!'' राजधेर किल्ला उतरताना आम्ही पार थकलो होतो तेव्हा आम्ही विचारलं मामा खाली गावात जरा चहा वगैरे मिळेल का? त्यावर मामांनी एकदम चिल्ल मूड मध्ये आम्हाला तोच डायलॉग ट्विस्ट करून मारला, ''हे बघा, इथून खाली गेल्यावर मी तुम्हाला सगळं सांगतो!! इथे काय मिळेल काय नाय ते मला आता विचरु नका!!''

२ दिवस मामा आम्हाला किल्ले दाखवत होते, मामांना किल्ल्याची खडानखडा माहिती होती पण त्याच्या एकूणच व्यक्तिमत्वामुळे आम्ही वैतागत पण होतो आणि एन्जॉय पण करत होतो. दुसऱ्या दिवशी इंद्राई किल्ला चढताना आम्ही आर्ध्यावर पोचल्यावर मामांनी आम्हाला सांगितलं, चला आता मला तुमच्या समद्यांची जरा नीट वळख करून द्या! आता इथे आमचा मित्र वरुण जो फॉर्म मध्ये आला, एका क्षणाचाही विलंब नं करता त्याने लगेच मामांच्या स्वरात हे बघा मामा, इथे वर गेल्यावर आम्ही तुम्हाला समदी माहिती सांगतो! हा डायलॉग मारून घरात नाही दारात नाही असा उंबऱ्यावर हिरण्यकश्यपू सारखा आमच्या मामांचा कोथळाच वरुण ने बाहेर काढला. मामांनी पण हा जोक एकदम मनापासून एन्जॉय केला.

मामांची किल्ला दाखवण्याची एक स्वतंत्र पद्धत होती. मामा सतत आम्हाला surprise देत देत किल्ला दाखवत होते. किल्ला उतरताना आम्ही आपले आलो त्या मार्गाने परत चाललो होतो तेवढयात मामा म्हणाले, अरे तिकड कुठं चालले! हिकडून चला, असं म्हणत मामा आम्हाला ऐका छोट्याश्या खबदाडीतून उतरायला सांगितले. आम्हाला कळेना कुठे चाललोय पण मामा भरभर चालत राहिले आणि आम्ही त्यांच्या पाठी, पुढे खाली उतरल्यावर सांगितले की ही चोर वाट हाय! मामा जणु काही त्यांच्या त्या निळ्या पिवशीतून असे वेगवेगळे surprises काढून आमच्या समोर ठेवत होते आणि ते आमचे आश्चर्यचकित चेहरे बघून मामांना वेगळाच आनंद मिळत होता. आपला हा किल्ला लोकांना दाखवण्याचं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होत.

आणि आता ट्रेक म्हंटल कि फोटो काढणं आलाच. आम्ही आपले नेहमीच्या पोज देऊन फोटो काढत होतो, मामा लांबून आमच्याकडे निरखून बघत होते शेवटी न राहुन ते आमच्या जवळ आले आणि त्यांच्या स्टाईल मध्ये म्हणाले तुम्हाला पोज मारता येत नाय! इथे आम्हा स्वयंघोषित instagram मॉडेल्स चा स्वाभिमान दुखावला आम्ही म्हटल मग मामा तुम्हीच दाखवा कशी देतात पोज ते!

मग मामा पुढे सरसावले आणि कुस्ती खेळतात तश्या पोज मध्ये उभे राहिले आणि म्हणाले, अशी असते पोज, आता काढा फोटो असं म्हणुन स्वतःचेच फोटो काढून घेण्यात मग्न झाले.



मामा!



या कुस्ती खेळुया!

तस मामांमध्ये हरितात्याची पण थोडी झलक होती ते प्रत्येक प्रसंग स्वतःला add करून सांगायचे. किल्ल्यावर एका ठिकाणी गायीचा सापळा पडला होता. बहूतेक बिबट्याने शिकार केली असावी असं आम्हाला वाटत होतं, तेवढ्यात मामा मागून आले आणि त्यांच्या स्टाईल मध्ये म्हणाले मी इथं समोर बसलो होतो! त्या समोरच्या झुडपातून बिबटया आला अन माझ्या समोर इथ बिबट्याने हिला मारली. मामा हे सगळं



बिबट्याने मामां समोर मारलेली गाय आणि तीचा सांगाडा


इतकं तन्मयतेने सांगत होते कि यापुढे जर त्यांनी हा बिबट्या तसा माझा पाळीव बिबट्या आहे असं सांगितलं असतं तरी आम्ही विश्वास ठेवला असता. अश्या एक ना अनेक गमतीजमती आमच्या चालू होत्या.

किल्ला उतरून खाली आलो की मामा त्याच्या जड आवाजात प्रश्न विचारायचे.. मग राजे....कसा वाटला माझा किल्ला?.. समदा किल्ला नीट दाखवला ना मी? समद्या पुस्तकात असलेल्या गोष्टी दाखवल्या की नाही? नाय मंग नंतर घरी जाऊन म्हनाल मामा XXXX आहे, किल्ला नीट दाखवला नाही. अशी एकदम दिलखुलास पर्सन्यालीटी होती आमच्या मामांची. आम्ही हसून हसून पार येडे होत होतो.

मामा गावातल बड प्रस्थ आहे. मामांनी गावसाठी बरीच मेहनत घेतली आहे त्याच्या मेहनतीतून गावाला पाणी foundation चा आदर्श गावाचा पुरस्कार देखील मिळाला आहे. लोक सहभागातून मामांनी गाव पाणीदार केलं आहे. गावात ठिकठिकाणी शेततळी खोदली आहेत.

तसचं मामांच एकूण आयुष्य बरंच हलाखीत गेलं होत, वेळप्रसंगी मामांनी मामींना त्याच्या माहेरी ठेवलं होतं आणि स्वतः ट्रक ड्राईव्हर म्हणून काम करत होते. मामा सांगत होते, बायको ला ३ वर्ष माहेरी ठेवली, तिच्या घरच्यांना वाटलं पाव्हणा काय पोरीला परत नेत नाय. मंग जेवा आपल्याकडे नीट पैसा आला तेवा तिला परत आणली. या तीन वर्षात मामांनी बरीच मेहनत केली, पडेल ती कामं केली आणि आज मामा आणि मामी एकदम खुशीत संसार करताहेत.

अशे हे आमचे मामा म्हणजे वसंत विठ्ठल जाधव या वल्ली मुळे ट्रेक ला आणखी रंग चढला आणि आमचा ट्रेक अविस्मरणीय झाला. ज्यांना कोणाला राजधेर आणि इन्द्राई हे किल्ले बघायचे असतील त्यांनी ते वसंत मामांसोबतच बघावे.



जेव्हा ट्रेकलीडर सांगतो आज दुपारी जेवणात चिकन आहे

# बारवस्थापत्याचा अविष्कार - पुष्करणी

पुष्करणी हा बारव स्थापत्यातील एक महत्वाचा प्रकार आहे. या चौरसाकृती, आयताकृती बांधलेल्या असतात. यात मध्यभागी पाण्याचे कुंड असते. कुंडाच्या वर एका आत एक चौरस बनवून अशी पायऱ्यांची रचना केलेली असते. पूरातन मंदिरांच्या परिसरात पुष्करणी बांधलेल्या पाहायला मिळतात. बारवेच्या भिंतीत देवकोष्ठांची रचना असते. त्यात देवतांच्या मुर्ती पाहायला मिळतात. जनसामान्यांची पाण्याची गरज भागावण्यासाठी महाराष्ट्रात मंदिर, गाव, नगर, किल्ले इत्यादी ठिकाणी विविध राजवटीत पुष्करणी बांधण्यात आल्या.



**पुष्करणी, रतनवाडी**
छायाचित्रकार: राहुल मेश्राम



**पुष्करणी, अंबड**
छायाचित्रकार: ॐकार धुळप



**पुष्करणी, हरिश्चंद्रगड**
छायाचित्रकार: वरुण देवरे



**पुष्करणी, हंपी (कर्नाटक)**
छायाचित्रकार: वरुण देवरे



**पुष्करणी, गंडिकोटा (आंध्र प्रदेश)**
छायाचित्रकार: सुरेखा कोल्हाळ



**पुष्करणी, सूर्य मंदिर, मोढेरा (गुजरात)**
छायाचित्रकार: सुरेखा कोल्हाळ

# मोक्याचा मोहनगड

– चैतन्य सबनीस

रणरणते उन, प्रवाशांनी खच्च भरलेली बस आणि चालकाने आधीच फाटलेल्या स्पीकर वर मोठ्या आवाजात लावलेली टुकार गाणी. रोहिडा किल्ला पाहिल्या नंतर पुढच्या प्रवासात अर्धवट झोप पूर्ण करण्याचा आमचा प्लॅन या सर्व गोष्टींनी धुळीस मिळवला. पण तरीही मनात कुठेही कुरबूर नव्हती. सूर्यास्ताच्या आत मोहनगड गाठणे शक्य होते आणि ती गोष्ट मनाजोगी घडत होती.



शिवचरित्रातील अफजल प्रकरणाआधी याचा उल्लेख वाचला होता. महाराजांनी बाजीप्रभूंना मोहनगड बांधण्याचे आदेश दिले. पण या व्यतिरिक्त काही वाचनात आले नव्हते. पण नंतर काही ट्रेकर मित्रांचे ब्लॉग वाचून त्याच्या विषयीची उत्सुकता वाढली. याचे प्रमुख कारण होते मोहनगडावरुन दिसणारा देश आणि कोकणचा विस्तृत प्रदेश.

संध्याकाळी ५.३० च्या सुमारास दुर्गाडी गावात पोहोचलो. तिथून गडावर जायला ठळक वाट दिसत होती. पण गडाखालचे जंगल आणि अंधार पडलाच तर भरकटण्याचा धोका लक्षात घेऊन गावातून एक वाटाड्या सोबत घेतला. वर जाउन परिसर न्याहाळायची एवढी उत्सुकता होती की वाटेत एक दोनदाच थांबून लगेच पुढे निघालो. चढाई करता करता वाटाड्या मामांशी गप्पा पण रंगात आल्या होत्या, त्यांच्या कडून किल्ल्यावर जाणाऱ्या बाकीच्या वाटांची माहिती मिळाली. शिरगावातून दोन तर दुर्गाडीतून एक वाट किल्ल्यावर जाते. दुर्गाडी वरुन जाणारी वाट जरा लांबची आहे. १५ मिनिटिच्या चाली नंतर गावकर्यांनी बांधकाम सुरु केलेल्या एका मंदिरापाशी पोहोचलो. इथून उजवीकडे किल्ला, त्यावर जाणारी सोंड आणि सोंडेवरील दाट जंगल दृष्टीपथात येते. या वाटेवरुन मार्गक्रमण सुरु केले.

वीस पंचवीस मिनिटात एक वाट समोरुन येउन आमच्या वाटेला मिळाली. ही शिरगावातून आलेली जंगलाची वाट. येथून पाच मिनिटे चढलो आणि उजव्या हाताला तोरणा किल्ल्याच्या बुधला माचीने लक्ष वेधून घेतले. तोरणा, उजव्या हाताला राजगड स्पष्ट दिसत होते. कॅमेरा काढून त्या अंधारात आणि धुरकट आकाशातही ते दृश्य टिपण्याचा मोह आवरता आला नाही. अजून दहा मिनिटांच्या चढाई नंतर डावीकडे दोन डोंगरांमधे प्रतापगड दिसायला लागला. किल्ला चढतानाच मोठा परिसर नजरेत येत होता. उत्तरेला तोरणा राजगड आणि त्यांना जोडणारी डोंगररांग. पूर्वेला रायरेश्वर पठार, त्याच्या मागे काहीसा आग्नेयेला महाबळेश्वरचा डोंगर आणि दक्षिणेला प्रतापगड.

काही वेळातच मोहनगडचा कातळकडा लागला. येथून उजवीकडे वळून कातळकडा डाव्या हाताला ठेवून वाट पुढे जाते. ही वाट दाट जंगलातून आहे. पुढे दहा मिनिटात डावीकडे एक छोटी देवाची मूर्ती दिसते आणि तिथेच उजवीकडून एक वाट येउन मिळते. ही वाट शिरगावातील जननी मातेच्या मंदिराकडून आलेली आणि सगळ्यात जवळची व सोपी वाट. इथून पुढे कातळकड्याचा खडा चढ सुरु होतो. काही ठिकाणी उध्वस्त पायर्या लागतात. साधारण वीस मिनिटात आपण मंदिरापाशी येतो.



येथून दिसणारा देखावा थक्क करणारा आहे. वायव्येला रायगड, उत्तरेला तोरणा, राजगड आणि त्यांना जोडणारी डोंगररांग एका सरळ रेषेत दिसतात. तोरण्याची बुधला माची, बालेकिल्ला, झुंजार माची आणि राजगडची संजीवनी माची, बालेकिल्ला व सुवेळा माची अगदी स्पष्ट दिसतात. थोड पश्चिम





दिशेला पाहिल तर खालच्या बाजुला मंगळगड, आणि दूर दूर पर्यंतचा प्रदेश दिसतो. मामांनी आम्हाला सागितल्याप्रमाणे तो बिरवाडी आणि महाडचा प्रदेश. तर ईशान्येला रोहिडा आणि नीरा देवघरच धरण दिसत.

वर आल्यावर एक छोटी वाट खाली गेली आहे. तिथे पाण्याची टाकी आहेत. त्यापैकी दुसऱ्या टाक्यातील पाणी पिण्यायोग्य आहे. पण टाक्यापर्यंत जाणारी वाट चिंचोळी आहे आणि डाव्या हाताला दरी. ही वाट पाहून कोकण दिव्यावरील टाक्यांची आठवण झाली.

जेवणाचे सामान आम्ही घेउन गेलो होतो, मामांनी पाण्याचा हंडा भरुन दिला होता. मंदिराच्या ओसरीवर बसून संधीप्रकाशात समोरचे दृश्य न्याहाळत गप्पा सुरु झाल्या. हा किल्ला टेहळणी साठी बांधला गेला. खरच टेहळणी साठी एवढी उत्तम जागा नाही. पुस्तकात अफजल प्रकरणा आधी आलेला तो प्रसंग आठवला. त्या काळी गवताची गंजी पेटवून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी संदेश दिला जात असे. अफजल युद्ध झालेला प्रतापगड आणि राजधानी राजगड दोन्ही मोहनगडावरुन स्पष्ट दिसतात. कदाचित हाच हेतू ठेवून महाराजांनी बाजीप्रभूंना आज्ञा दिली असेल.

रात्री येथून आकाश दर्शन हा ही अनोखा अनुभव आहे. येथे छोट्या मंदिरात रात्री राजगड बालेकिल्ल्यावरील ब्रम्हर्षी मंदिरात घालवलेल्या रात्रीची आठवण आली.



दुसऱ्या दिवशी सकाळी शिरगाव बाजुला उतरलो. ही वाट गावकरी नेहमी वापरत असल्याने मळलेली आहे. जननी माता मंदिर ते शिरगाव या रस्त्यावरुन मोहनगडाचे विहंगम दृश्य आणि पक्ष्यांची किलबिल यांच्या साथीने आणि कावळ्या किल्ला सर करायच्या निर्धाराने मार्गक्रमण सुरु केले.



**चित्रकार – सुनील देशमुख**

# ड्यूक्स नोज (नागफणी) ते उंबरखिंड

– श्रेयस पेठे

ऐन गणपतीची वेळ. रविवारची ढोल प्रॅक्टिस बाजूला ठेवून (त्यासाठी शनिवारी जादा सराव करून) रविवारी सकाळी साडेसहाच्या लोकलने लोणावळे गावाकडे प्रस्थान केले. प्रसन्न दिवस होता. चिंचवड सोडताच भुरभुरायला सुरुवात झाली. सोबत यावेळी काहीच सामान घेतलं नव्हतं फक्त दोन पाण्याच्या बाटल्या सोडल्या तर!!!



जरी सव्यसाची आणि श्रीकृष्ण दादा आमच्याच लोकल मध्ये होते तरी डबा वेगळा असल्याने त्यांची लोणावळ्यालाच भेट झाली. सव्वा आठच्या सुमारास इंद्रायणीने मुंबईकरांचे आगमन झाले. गाठीभेटी गप्पांमध्ये ग्रुप एकरूप झाला. शिवाजी चौकातून सुमोमधून आम्ही कुरवंडे गावी आलो. नाष्ट्याची वेळ झालीच होती. जबरदस्त भूक लागली होती. गरम पोहे आणि दोन – तीन कप गरमागरम चहा मारला. आदित्यने सर्व सूचना दिल्या. नवीन सदस्यांची ओळख झाली. अमित मोरे यांनी यावेळी त्यांच्या सोबत नवीन आणलेल्या ट्रेकर्समुळे आकडा सात वरून नऊपर्यंत गेला होता. चिपळूणवरून पाटील कुटुंबीय (जुळ्यांच्या जोडीसह यश आणि ओम) आले होते. एकंदरीत पावसाची भुरभुर, बहुतेक ओळखीचे चेहरे यामुळे धमाल येणार हे नक्की होतं.

कैलास काकांच्या मागेमागे ड्युक्स नोज कडे निघालो. जातानाच एका टेकडीवर इंद्रायणी नदीचे उगमस्थान नजरेस पडले. जिने ज्ञानोबा-तुकोबांना विठ्ठलाची ओढ लावली, तिने आम्हाला आकर्षित केलं नसते तर नवलच. उगमाचे दर्शन घेऊन एका वळणावरून काही वेळातच शिखरावर पोहोचलो. दाट धुक्यामुळे काही दिसत नव्हतं. ड्युक्स नोज कडा बरेच गिर्यारोहक चढून सुद्धा येतात. आजूबाजूला बोल्ट दिसत होते. कड्यावर एक शंकराचे मंदिर आणि पन्नास जण थांबतील एवढी जागा आहे. ड्युक्सच्या समोरच Dutch शिखर आहे त्यांच्या मध्ये Valley क्रॉसिंग केलं जातं. मराठीत या शिखराला नागफणी म्हणतात. परंतु धुक्यामुळे निराशा झाली. त्यानंतर आम्ही थोडासा फराळ व फोटोसेशनचा आनंद घेतला. आलेल्या वाटेने खाली उतरुन ज्या वळणावरून शिखराकडे आलो होतो तिकडूनच उंबरखिंडीत उतरण्यास सुरुवात केली. या भागात दोन्ही बाजूला कारवी फुटायला सुरुवात झाली होती. महिन्याभरात परिसर निळाशार कारवीच्या फुलांनी नक्कीच भरून जाईल. पावसामुळे वाट निसरडी झाली होती त्यामुळे गणपती बाप्पा मोरयाचा गजर बऱ्याच वेळा झाला. आजूबाजूचे डोंगर, समोर दिसणारे धबधबे, खाली दृष्टिक्षेपात येणारा हिरवा निसर्ग सारेच वेड लावणारे होते. मध्येच अंबा नदीचा प्रवाह तसेच दोन तीन ओढे आम्हाला सामोरे गेले. असे खळाळते पाणी पाहून कुणालाच राहवले नाही, पाण्यात खेळण्याची हौस प्रत्येकाने पूर्ण करून घेतली. त्यात बच्चे कंपनी आघाडीवर होती. जे येत नव्हते त्यांना ओढून आणून भिजवले. निसर्ग आज अगदी खुश होता. काही वेळातच चावणी (जि.रायगड) गावात उतरलो. कोकणात उतरल्याची खूण म्हणजे दमट हवामानामुळे उकडायला सुरुवात झाली होती. आज जेवायला पाटील व मोरे कुटुंबामुळे बहार आली. उकडलेले बटाटे, अंडी त्यावर चाट मसाला....अहाहा!! असे जेवण होणे नाही!!!

जेवण झाल्यावर गावातून उंबरखिंड स्मारकाकडे चालण्यास सुरुवात केली. पंधरा ते वीस मिनिटांमध्ये अंबा नदीच्या कडेकडेने स्मारक परिसरात दाखल झालो. नदीच्या पात्राच्या पलीकडे धनुष्यबाण, भाला, तलवार, ढाल आणि भगवा ध्वज असा रेखीव स्तंभ दृष्टीस पडतो. आम्ही अलीकडच्या तीरावरच ठाण मांडला. श्रीकृष्ण दादाने उंबरखिंडीची आणि येथे झालेल्या लढाईची माहिती सांगण्यास सुरुवात केली. भरपूर पाऊस, नदीचा खळाळता प्रवाह, समोर मनाला उर्जा देणारे स्मारक आणि दादाचे शब्द. प्रत्येक प्रसंगात अंगावर शहारे आणि महाराजांबद्दल





आदर अभिमान अधिकच बळावत होता. कारतलबखानाची झालेली त्रेधातिरपीट, महाराजांची मुत्सद्देगिरी याबाबत दादाने मुद्देसूद माहिती दिली. आम्ही जरी या उंबरखिंड उतरलो असलो तरी कारतलबखान लोहगडमार्गे उतरला होता. या मार्गाने सुद्धा खिंडीची भयानकता जाणवतेच. शिवभारतमध्ये या लढाईच्या प्रसंगाचे वर्णन अगदी सुंदर केले आहे. महाराजांनी परिधान केलेल्या पोषाखाबाबत इत्यंभूत माहिती मिळते.

इथेच सर्वांचा एक छान पैकी फोटो काढून टमटमने सर्वांनी खोपोली गाठले. तिथून पुणेकरांनी लोणावळामार्गे पुण्याकडे तर मुंबईकरांनी कर्जत मार्गेलोकलने मुंबईकडे प्रयाण केले. वेळेत लोकल मिळाल्याने सर्वांना हायसे वाटले.

आयुष्यातील अजून एक दिवस सार्थकी लागल्याच समाधान मनात घेऊन संध्याकाळी पुन्हा नव्या उत्साहाने ढोलच्या सरावाच्या ठिकाणी पोहोचलो.

**फोटो सौजन्य – निनाद खिस्ती**



# थोडक्यांत महत्वाचे!

नमस्कार,

आपण सर्वजण आजकाल ट्रेक मध्ये पाणी वाहून नेण्यासाठी पाण पिशवी (Hydration Bag) वापरतो. ही बॅग अत्यंत उपयुक्त आहे कारण ती २- ३ लिटर पाण्याची सोय सहज करते, सहजतेने सॅक मध्ये बसते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तहान भागवतांना हात मोकळे राहतात आणि पाणी पितांना सॅक खांद्यावरुन उतरवावी लागत नाही.

तथापि, थोडे दिवस पाण पिशवी वापरल्यानंतर आतील बाजूस व पाईपमध्ये कचरा गोळा झालेला दिसतो. ट्रेक दरम्यान आपण नद्या, टाकं, विहिरी इत्यादी ठिकाणाहून पाणी भरतो त्यासोबत आलेला कचरा पाण पिशवीच्या आत कोपऱ्यात, नळी मध्ये साठून राहातो .

ती स्वच्छ करण्यासाठी मी अनेक प्रयोग केले. कोमट पाण्याने स्वच्छ धुण्याचा प्रयत्न केला. तरीही घाण आणि गडद डाग तसेच राहीले. बॅगेच्या लहान ओपनिंगमुळे माझे हात / बोट आतल्या कोपऱ्या पर्यंत पोहोचू शकत नव्हते. साबण / सर्फ वापरण्याचा विचार केला परंतू भीती होती की, माझ्या पुढच्या ट्रेकमध्ये पाण्याला साबणाचा वास येईल. साफ सफाईसाठी टुथ पेस्ट आणि ब्रश का वापरू नये? हा विचार अचानक मनात आला.

मग काय, माझा जुना टुथब्रश घेतला आणि लागलो कामाला. ब्रश अगदी सहज पिशवीच्या कानाकोपऱ्या पर्यंत पोहोचला व पेस्ट मुळे पिशवी मस्त स्वच्छ झाली. सर्व घाण आणि डाग दूर झाले. पेस्ट मुळे पाण पिशवीला चांगला वासही आला.

प्रश्न आता ट्यूबचा होता. लगेच बायकोने एक बारीक आणि लांब ब्रश शोधून दिला (फोटो पहा). त्याला एक दोर बांधून ट्यूबच्या आत टाकला आणि पुढे मागे करत सगळी ट्यूब आतून छान साफ केली.

आता मी पाण पिशवी साफ करण्यासाठी नियमितपणे हे तंत्र वापरतो.

पुढील ट्रेकला जाण्यापूर्वी पिशवी साफ करण्यासाठी ही युक्ती तुम्ही नक्कीच वापरुन पाहा .

हॅपी क्लिनींग व हॅपी ट्रेकिंग!

**निनाद विलणकर**



# जन्म आपल्या हिमालयाचा

**– शार्दुल भोगले**

होय! बरोबर ओळखलं तुम्ही, आज मी तुम्हाला सांगणार आहे, हिमालय बद्दल. त्याचा प्रवास, त्याची निर्मिती आणि काही अशा गोष्टी ज्या हिमालयात भटकंती केलेली असुनही आपल्याला कदाचित माहिती नाहीत.

हिमालय नाव ऐकताच डोळ्या समोर येतात ते बर्फाचे डोंगर. कधी विचार केला आहे का तुम्ही हिमालयाची निर्मिती कशी झाली असेल? जगातल्या सर्वात उंच डोंगर रांगा कशा तयार झाल्या असतील. या हिमालयात अनेक आश्चर्यचकित करणाऱ्या गोष्टी आहेत . त्यातलीच एक म्हणजे K2 या जगातल्या दुसऱ्या क्रमांकाच्या शिखराची. हा पर्वत आहे पाकिस्तान व्याप्त काश्मीर मध्ये पण जेव्हा तुम्ही पर्वताच्या सर्वोच्च स्थानावर उभे राहाता तेव्हा तुमची सावली ही थेट चीन मध्येही पडते. अशाच काही अपरिचित गोष्टी आज मी तुम्हाला या लेखामधून सांगणार आहे.

माझं प्राफेशन हे पर्यटन क्षेत्रात असल्यामुळे माझे बरेच हिमालयातले ट्रेक झाले होते. आपल्या सह्याद्री मध्ये ट्रेक करत असताना माझ्या मनात विचार आला की सह्याद्री आणि हिमालय हे दोन्ही पण डोंगरच आहेत, मग दोघां मध्ये एवढे मोठे फरक का आहेत? हिमालय एवढा उंच कसा? दोन्हीकडे माती वेगळी, दगड वेगळे आणि जीवन पण वेगळे. असे का झाले असेल?

तर चला मग करूया सुरुवात या प्रवासाला. यासाठी आपल्याला जावे लागेल थेट दक्षिण ध्रुवावर. आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की भारत आहे तर उत्तरेकडे मग दक्षिण का? कारण की आपल्या भारताचा व्दिपकल्प (पेनिंसुला) हा एके काळी दक्षिण ध्रुवाजवळ होता. कस काय शक्य आहे हे? .... अहो खरच! तुम्हीं कधी गोंडवाना हे नाव ऐकले आहे का? आज जे आपण वेगळे वेगळे खंड बघतो हे सगळे खंड एकेकाळी एकाच जमिनीचा भाग होते त्याला गोंडवना या नावाने ओळखले जाते. पुढे जमिनीचे तुकडे होत गेले. हे तुकडे होण्याचे कारण असे सांगितले जाते की जमिनीतून (हॉटस्पॉट मधुन) लाव्हा रस बाहेर येण्यास सुरूवात झाली त्यामुळे जमिनीचे तुकडे होत गेले. खाली असलेल्या चित्रा मध्ये तुम्हाला भारतीय खंडाचा प्रवास बघायला मिळेल.


आता तुम्हाला कदाचित हा प्रश्न पडला असेल की हे जमिनीचे तुकडे नेमके कसे सरकले





असतील? सोप्या भाषेत सांगायचे तर, आपल्या पृथ्वीच्या पोटामध्ये (केंद्रामध्ये) असलेला लाव्हा रस. या जमिनीच्या तुकड्यांना, ज्यांना भूगोलाच्या भाषेत 'टेक्टॉनिक प्लेट' असे म्हणतात त्यांना सरकवत आहे. याच प्लेट 'एस्थेनोस्मियर' नावाच्या लेयर वरती तरंगत असतात. याच लेयर वरती असणारा लिथोस्मेयेर (जिथून जमिनीचा भाग सुरू होतो) एका प्रकारे लाव्हा बाहेर येण्यापासून थांबवतो आहे. लाव्हाच्या सतत चालू असणाऱ्या हालचाली मूळे एस्थेनोस्मियर या जमिनीचा तुकड्यांची (खंडांची) हालचाल करत राहतो. त्यामुळे रोज या प्लेट थोडी थोडी हालचाल करतच असतात. अश्याच प्रकारे आपली इंडियन प्लेट सरकत सरकत वर उत्तरे कडे आली आणि मग ती पुढे युरेशियन प्लेटला जाऊन आदळली. इथूनच सुरुवात झाली हिमालयाच्या निर्मितीची. या प्लेटचे तसे वेगळे वेगळे प्रकार आणि परिणाम असतात, पण सध्या आपण मकॉन्टिनेन्टलम आणि मओशनिकम प्लेट ह्याकडे बघणार आहोत. Indian subcontinent drift-pl.svg by Wikimedia commons - CC BY 3.0 BY 3.0

भारताच्या प्लेटचे दोन भाग आहेत ते म्हणजे बाहेरचा भाग हा ओशनीक (आपला समुद्र हा देखील एका प्लेट चा भाग आहे) आणि मध्यभागी कॉन्टिनेन्टल (जमिनीचा). या भागाचा प्रवास सुरू असतानाच हा द्विप काहीसा पूर्वेकडे झुकला गेला ज्यामुळे पश्चिमे कडील समुद्राचे टोक आधी आदळले. हे होताच काही वर्षातच तेथे ज्वालामुखीची निर्मिती झाली. जेव्हा एखादी ओशनिक प्लेट कॉन्टिनेन्टल प्लेटला येऊन आदळते तेव्हा ओशनिक प्लेटचा दबाव जास्त असल्यामुळे ती खाली जमिनीत जायला सुरू होते आणि दुसरी हलकी असल्यामुळे ती त्या प्लेट वर येते. अशावेळी खालती गेलेली प्लेट भूगर्भात लाव्हा मध्ये जाऊन वितळते आणि लाव्हा वरती फेकायचा प्रयत्न करते. इथूनच मग पुढे ज्वालामुखी ची निर्मिती होते. आता तुम्ही म्हणत असाल म्हणजे आपल्या हिमालयामध्ये






ज्वालामुखी आहेत? आहेत नाही होते. हो, जसे मी म्हणालो की भारताचे द्विप दोन भागात विभागले गेले होते. तसाच जमिनीचा भाग आला तेव्हा दोन्ही प्लेटचा दर्जा एक सारखा असल्यामुळे दोघांमध्ये, भारतीय प्लेट जराशी खाली खचली आणि युरेशियन प्लेट डोंगरांच्या स्वरूपात वर येत राहिली. याच सोबत पृथ्वीच्या आत मध्ये काहीच गेले नाही आणि लाव्हा बाहेर येणे थांबले.

अशाप्रकारे जसा दरवाजा बंद करतो तसेच पूर्वेकडील भाग हळू हळू बंद होत गेला आणि पश्चिमेपासून पूर्वेकडे हिमालयाची निर्मिती होत गेली. आज देखिल भारताची प्लेट दर वर्षी ५ सेंटीमीटरने सरकत आहे. या सगळ्याचा शोध कसा लागला? याचा पण विचार मनात येत असेल ना? काही वर्षांपूर्वी हिमालयात शोध घेत असताना समुद्रातल्या प्राण्यांचे जीवाश्म (फॉसिल) मिळाले. तेव्हा असे कळले की येथे तेथीस नावाचा समुद्र होता. याच सोबत दक्षिण अमेरिका, अफ्रिका, ऑस्ट्रेलिया, आणि भारतात एकाच प्रकारचे दगड व प्राण्यांचे जीवाश्म मिळाले. यातले एक जीवाश्म म्हणजेच गलोसूप्टरीस (फर्न सारखे) आणि लिस्त्रोसौरस. हे सगळं उलगडत असतानाच या 'टेक्टॉनिक प्लेट थिअरी' चा शोध लागला. जर याच द्विपाची समुद्र भागाची प्लेट कुठे अडकली असती तर कदाचित आज भारताचा भूगोल वेगळा असता. उत्तरप्रदेश, बिहार, काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल व इतर काही भागात आज समुद्र असला असता आणि भारत हा पूर्णपणे एक स्वतंत्र द्विप असला असता.

पण खरं बघायचं तर या हिमालयाची आपल्यावर कृपाच आहे. आज याच हिमालयाच्या भागात असणारे तिबेट पठार आपल्या भारतात पाऊस आणण्यासाठी मदत करते. हिमालयातील ग्लेशियर मधून उगम पावणाऱ्या गंगा, यमुना, सिंधू, ब्रह्मपुत्रा सारख्या नद्यांनी आपला देश सुपीक बनवला आहे. हिमालयामुळे आपले परकीय आक्रमणापासून काही प्रमाणात संरक्षण देखील झाले आहे. काही दिवसांपूर्वीच असे कळाले की चीन आणि नेपाळ मिळून एव्हरेस्ट ची उंची पुन्हा एकदा मोजत आहेत. याचे कारण म्हणजे २०१५ मध्ये नेपाळ येथे आलेला भूकंप. जसं आधी पण म्हणालो की रोज या प्लेट हलत आहेत ज्यामुळे असे भाकीत करण्यात आले आहेत की काहीच वर्षांनंतर एव्हरेस्ट अजून उंच झालेला असेल किंवा त्यापेक्षा उंच डोंगराची निर्मिती होईल. सध्या हिमालयाची उंची ही ८,८४८ मी. इतकी आहे. याच सोबत दरवर्षी ही प्लेट सरकत असल्यामुळे जवळपास अर्धा ते २ सेंटीमीटर एवढा बद्दल होत असतो. सध्या सर्व्हेऑम इंडीयाने १९५६ मध्ये मोजलेली उंची ग्राह्य मानली जाते. पण त्यावेळी वापरण्यात आलेले यंत्र आणि आताची अत्याधुनिक यंत्रणा यामध्ये फरक आहे. आत्ताच्या मोजणीसाठी समुद्र सपाटी हा रेफर्स पॉइंट (चीनाच्या बाजूचा) येलो सि ची घेण्यात आला आहे आणि नेपाळ कडून बे ऑफ बंगाल येथील एक रेफर्न्स पॉइंट घेण्यात आला आहे. नेपाळचा रिपोर्ट तयार असून ते चीनच्या रिपोर्ट ची वाट पाहत आहेत.

तर असा आहे आपल्या हिमालयाचा जन्म. या स्वर्गासम हिमालयाच्या सानिध्यात राहण्यामुळे आपला आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन पूर्णपणे बदलून जातो. या पृथ्वीवरील स्वर्गाला तुम्ही पण एकदा नक्की भेट द्या.

पुढच्या वेळेस भेटूया सह्याद्रीच्या जन्माची गोष्ट घेऊन..

**संदर्भ– वरील बहुतांश माहिती NCERT ह्या पुस्तकांमधून घेतली आहे.**

**Photo credit: Google**



# गोंधळ

– नंदु देवधर

नास केला पाण्याचा केली खराब टाकी तळी
पिंजारूनी कचरा केला जागोजागी कुणी?
कधी झाडावर, कधी दारावर, कधी भिंतीवर नांव कोरी
कशी दुर्दशा चालली शिवबाच्या गडावरी
गोंधळ माजला गडावर गोंधळ माजला

अश्लील चाळे करून गडावर धूम्रपान तो करी
मूर्ख, करंटा, दिवटा वणवा लावून करतो होळी
कधी येणाऱ्याला, कधी जाणाऱ्याला,
कधी राहणाऱ्याला त्रास देई
कशी दुर्दशा चालली....
गोंधळ माजला.....

नाकर्ते सरकार भरीला निष्क्रिय झाले जनं
अनास्थेच्या दुर्दशेने भरून येते मनं
या गडासाठी, या गावासाठी,
या देशासाठी दिले प्राण तो शिवबा छत्रपती
गोंधळ माजला.......

श्रमदानाचे श्रेष्ठदान मी करतो गडावरी
कर्तव्याचे भान राखूनी मान ठेवितो उरी
त्या मेटावर, त्या तटावर, त्या कड्यावर साद घाली
तो शिवबा छत्रपती
गोंधळ माजला....


भग्न झाल्या वास्तू उध्वस्त झाले गड
इतिहासाचा शिलेदार तो जाऊन पाया पड
घे देवाची आन, राख गडाची शान, मनी शिवबाचा अभिमान
अंबे गोंधळाला ये...

गोंधळ मांडला गडावर गोंधळ मांडला
गोंधळ मांडला अंबेचा गोंधळ मांडला



फोटो सौजन्य – विशाल देवकर


Cartoon Source - Google


चित्रकार – आरती दुगल

# करोना, निसर्ग आणि ट्रेकक्षितिज

– राहुल मेश्राम, (अध्यक्ष, ट्रेकक्षितिज संस्था)

### हंगर हेल्पलाईन

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे पूर्ण देश स्थानबद्धतेत आहे. स्वतः घरात राहून रोगप्रसार थांबविण्याची जबाबदारी आपल्यापैकी प्रत्येकावर आहे. सरकार आणि प्रशासनाकडून गरजूंना सर्वतोपरी मदत सुरू आहे. परंतु संकटच एवढं मोठं आहे की सर्वांपर्यंत मदत पोहोचविणे कठीण होत आहे. ही समस्या सोडवण्यासाठी डोंबिवलीच्या विवेकानंद सेवा मंडळने पुढाकार घेतला व त्यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत ट्रेकक्षितिज संस्थेच्या कार्यकर्त्यांनी खारीचा वाटा उचलला आहे. ह्या आधी पण ट्रेकक्षितिज संस्थेने $VSM^2$ मंडळासोबत संयुक्तपणे उपक्रम राबविले आहेत.

सध्या कोरोना महामारीमुळे काही महिन्यांपासून रोजगार नाही तसेच काम नाही त्यामुळे पैशे नाहीत अशी अवस्था बऱ्याच दैनिक वेतन मिळविणाऱ्यांची आहे. यात प्रामुख्याने परप्रांतीय असल्याने बऱ्याच रोजंदारी कामगारांकडे रेशन कार्ड देखील नव्हते. देशभरातल्या अशा अनेक स्थलांतरीत असंघटित मजुरांपर्यंत अन्नधान्य, किराणा व औषधाची मदत पोहचविण्यासाठी $VSM^2$ तर्फे 'हंगर हेल्पलाईन' चालवण्यात आले. या हेल्पलाईन मार्फत ठाणे, पुणे, पालघर आणि मुंबई जिल्ह्यातून तसेच गोव्यातून येणाऱ्या मदतीच्या हाकेस धावून जाऊन त्यांस धान्य, किराणा व औषधे पोहचविण्याची जबाबदारी $VSM^2$ मंडळातर्फे अनेक कार्यकर्ते उचलत आहेत. कॉल द्वारे संपर्क साधणाऱ्या व्यक्तीस करण्यात येणाऱ्या अन्नधान्य किराणाच्या मदतीसाठी काही प्रक्रिया सेट केल्या गेल्या आहेत. त्या प्रक्रियेप्रमाणे एका स्वयंसेवकास आठवड्यातून १ किंवा २ मदतीचे कॉल्स हाताळावे लागतात. ह्यामध्ये ट्रेकक्षितिजच्या सभासदांनी हेल्पलाईनच्या या कार्यात साहाय्य करताना, स्थानबद्धतेचे सर्व नियम आणि सूचनांचे पालन करून गरजू देशबांधवांना मदतीचा हात देऊन कुणीही उपाशी राहणार नाही याची खात्री केली आहे. आता देखील राज्यभरातून ह्या हंगर हेल्पलाईन मध्ये मदतीसाठी बरेच कॉल येत आहेत.

तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आतापर्यंत ६,००० पेक्षा जास्त देशबांधवांपर्यंत ही मदत पोहचविण्यात तडच् मंडळास यश आले आहे. घरून करता येणाऱ्या ह्या हंगर हेल्पलाईन मदत कार्यात ट्रेकक्षितिजच्या कार्यकर्त्यांनी स्वयंसेवक म्हणून केलेल्या कार्याचा संकटग्रस्थांच्या मनावर उमटलेला कृतज्ञतेचा ठसा कदापिही अस्पष्ट होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

### टास्क फोर्स

करोनाच्या प्रसारामुळे देशभर कठीण परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्रातील करोना बाधितांची संख्या ही देशात सर्वाधिक आहे. भविष्यात ही परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता गृहीत धरून केंद्र व राज्य शासनाच्या वतीने अनेक प्रकारे तयारी केली जात आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात स्वयंसेवकांची आवश्यकता लागणार याची जाणीव असल्यामुळे अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघ तर्फे डिझास्टर मॅनेजमेंट टास्क फोर्सची निर्मिती करण्यात आली होती.

महासंघाने या टास्क फोर्सच्या माध्यमातून जिल्हापातळीवर अतिशय प्रशिक्षित व अनुभवी स्वयंसेवकांची फळी सुसज्ज करण्याचे काम हाती घेतले होते. मुंबई, पुणे, नाशिक व इतर जिल्ह्यातील जवळपास १,५०० गिरिमित्र आणि दुर्गप्रेमी यांनी टास्क फोर्सच्या मदत कार्याकरीता नाव नोंदणी केली होती. ह्या मध्ये ट्रेकक्षितिज संस्थेच्या सभासदांनी देखील सक्रिय सहभाग घेऊन खारीचा वाटा उचलला.

नाशिक जिल्हा आपत्ति व्यवस्थापन व बचाव दल सोबत चत्रख्व टास्क फोर्स नाशिकचे दयानंद कोळी आणि काही सदस्य यांनी मिळून शासनातर्फे गरजूंना अन्नधान्य वाटप केले. ठाणे जिल्हा पोलिस आयुक्त यांनी ठाणे जिल्हा टास्क फोर्सचे समन्वयक ट्रेकक्षितिजचे राहुल मेश्राम यांना संपर्क करून झोन प्रमाणे स्वयंसेवकांची यादी मागवली. पुणे महानगर पालिकेच्या कोविड सेंटर येथे, MGMMo अध्यक्ष श्री. उमेश झिरपे यांच्या मार्गदर्शनाखाली, पुणे टास्क फोर्स गेली २ महिने सातत्याने मोठ्या प्रमाणात मदतकार्य करत आहे.

आजच्या या कठीण काळात मानवसेवा व देशसेवा करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे. चत्रख्व सतत शासनाच्या संपर्कात आहे. भविष्यात शासनाकडुन सूचना मिळताच मदतीसाठी गिर्यारोहकांची ही टास्क फोर्स व ट्रेकक्षितिजचे सदस्य सदैव तत्पर असतील यात शंका नाही.

### निसर्ग चक्रीवादळ

जुनच्या पहिल्या आठवड्यात महाराष्ट्रातील किनारपट्टी वरील अनेक भागात निसर्ग चक्रीवादळाचा मोठा तडाखा बसला होता. सर्व सरकारी यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्था वादळग्रस्थांसाठी मदतकार्य करण्यात व्यस्त होती. तरीही अशी अनेक दुर्गम स्थाने होती जिथे अद्याप मदत पोहोचली न्हवती. भटकंती करणाऱ्या अनेकांना दूर डोंगर-दऱ्यातील व किल्ल्यांच्या आसपास असलेल्या सगळ्यांचीच काळजी वाटत होती.

सुधागड किल्ल्याजवळील दुर्गम भागात मदत करण्यासाठी ट्रेकक्षितिज संस्थाने पुढाकार घेतला. संस्थेच्या सभासदांनी वादळग्रस्त गावांचे सर्वेक्षण करून तेथील गरजू आदिवासींना मदतकार्य केले. ह्या भागात प्रामुख्याने गरज होती अन्नधान्य किराणा व इतर जीवनावश्यक वस्तूंचे संच तसेच छप्पर व भिंत मोडलेली घरांना पावसापासून बचावाकरिता पत्रे देण्याची. आधीच ३ महिन्यांपासून कोरोनाच्या साथीमुळे प्रत्येकावर आर्थिक दृष्ट्या परिणाम होत होता त्यात भर म्हणून चक्रीवादळामुळे झालेले नुकसान, त्यामुळे गावकरी खचून गेले होते. संस्थेतर्फे वादळग्रस्थांच्या मदतीकरिता आवाहन करण्यात आले, परिणाम स्वरूप अनेक दानशूर व्यक्तींनी/ संस्थांनी ह्या कामात सढळ हस्ते मदत केली.

११ जुन रोजी संस्थेच्या वतीने वादळग्रस्तांना अन्नधान्य किराणा व इतर जीवनावश्यक वस्तूंचे संच देण्यात आले. झेंडेवाडी व पंचशील नगर या २ आदिवासी वस्तीमधील



तब्बल ६४ कुटुंबियांना ही मदत करण्यात आली. अन्नधान्य किराणा व इतर जीवनावश्यक वस्तूंचे संच हे विवेकानंद सेवा मंडळ डोंबिवली ह्यांनी उपलब्ध करून दिले होते. साहित्य वाटप करीता पाच्छापूर शाळेतील प्राचार्य श्री. अनिल राणे सर – श्री. दीपक माळी सर, ग्रामस्थ श्री. विश्वास तांबट काका – श्री. बच्चू भुस्कुटे काका आणि इतर गावकरी मंडळींनी मदत केली. ट्रेकक्षितिज तर्फे शार्दूल भोगले, कौस्तुभ सामंत व राहुल मेश्राम हे किट वाटपाकरिता उपस्थित होते.

१४ जुन रोजी संस्थेच्या वतीने वादळग्रस्तांना लोखंडी पत्र्यांचे वाटप करण्यात आले. वादळामुळे ज्या घरांचे छप्पर मोडले होते व छप्पर दुरुस्त करण्याकरीता ज्यांच्याकडे पैशे न्हवते अश्या आदिवासी पाड्यातील गरजूंना पावसाळा सुरु होण्याआधी संस्थेच्या माध्यमातून हे पत्रे देण्यात आले. दर्यागाव येथील १२ कुटुंबियांना व २ समाज मंदिरांना मदत करण्यात आली. अंदाजे ११२ लोखंडी पत्रे व १७ प्लॅस्टिकचे पत्रे देण्यात आले. लोखंडी पत्रे हे M/s. Roofs Ceilings India Pvt. Ltd. (श्री. निषद गांधी) ह्यांनी उपलब्ध करून दिले होते. साहित्य वाटप करीता दर्यागाव शाळेतील श्री. नारायण वारा सर, पाच्छापूर ग्रामस्थ श्री. विश्वास तांबट काका आणि इतर गावकरी मंडळींनी मदत केली. ट्रेकक्षितिज तर्फे दीपाली सबनीस, चैतन्य सबनीस, आनंद मयेकर, भावना मयेकर, प्रशांत मोहोकर, आरती मोहोकर व राहुल मेश्राम हे पत्रे वाटपाकरिता उपस्थित होते.

१ जुलै रोजी संस्थेच्या वतीने वादळग्रस्तांना अन्नधान्य किराणा व इतर जीवनावश्यक वस्तूंचे संच देण्यात आले. सुधागड किल्ला परिसरातील दर्यागाव / ठाकूरवाडी या आदिवासी वस्तीमधील तब्बल २५० कुटुंबियांना मदत करण्यात आली. अन्नधान्य किराणा व इतर जीवनावश्यक वस्तूंचे संच हे विवेकानंद सेवा मंडळ, अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघ व ट्रेकक्षितिज ह्या संस्थांनी उपलब्ध करून दिले होते. साहित्य वाटप करीता पाच्छापूर शाळेतील प्राचार्य श्री. दीपक माळी सर – श्री. अनिल राणे सर, शिक्षक श्री. नारायण वारा सर, दर्यागावचे पोलीस पाटील श्री. मोरेश्वर वारघुडे, तसेच ग्रामस्थ श्री. विश्वास तांबट काका – श्री. बच्चू भुस्कुटे काका आणि इतर गावकरी मंडळींनी मदत केली. ट्रेकक्षितिज तर्फे श्रेयस पेठे, महेंद्र देशमुख, पल्लवी भारंबे, नयना आघारकर व राहुल मेश्राम हे किट वाटपाकरिता उपस्थित होते.

या सोबतच ट्रेकक्षितिज तर्फे सुधागड परिसरातील वादळाचा तडाखा बसलेल्या ३ शाळांना पत्रे व दरवाजे देण्यात आले. दर्यागाव / ठाकूरवाडी येथील प्राथमिक शाळेचे छप्पर वादळामुळे मोडले गेले होते. ह्या शाळेला ४० सिमेंटचे पत्रे व १० ढापे जोड संस्थे मार्फत देण्यात आले, ज्यामुळे शाळेचे वर्ग व स्वच्छता गृह यांच्या पुनः उभारणीत संस्थेला योगदान देता आले. अशीच काहीशी परिस्थिती पाच्छापूर येथील प्राथमिक शाळेची देखील होती. येथे सुद्धा संस्थे तर्फे शाळेला २५ लोखंडी व २० सिमेंटचे पत्रे देण्यात आले. ग्रामीण भागातील ह्या दोन्ही शाळेला झालेल्या नुकसानाच्या सुधारणित संपूर्ण पत्र्याची सहाय्यता फक्त ट्रेकक्षितिज संस्थे तर्फे पूर्ण करण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे पत्रे बसवण्याचे हे संपूर्ण काम जुनच्या अखेरीस (पावसाळा सुरु होण्याआधी) पूर्ण करण्यात आले ज्यामुळे शाळेच्या भिंतींचे व फर्निचरचे पावसापासून रक्षण करण्यात यश मिळाले. या बरोबरच पाच्छापूर येथील माध्यमिक शाळेच्या वर्गांना, त्यांच्या आवश्यकते प्रमाणे, संस्थे मार्फत ३ दरवाजे देण्यात आले आहेत. त्यामुळे लॉकडाऊनच्या ह्या काळात, सोशल डिस्टेनसिंगचे सर्व नियम पळून, शिक्षकांना १०वी च्या विद्यार्थ्यांकरिता अभ्यासवर्ग घेणे शक्य झाले आहे. अजूनही ग्रामीण भागात शाळा सुरु झाली नसली तरी देखील शहरात मात्र स्मार्टफोनच्या माध्यमातून ऑनलाईन वर्ग नियमित सुरु आहेत. राज्यात कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे जर शासनाला शाळा सुरु करण्यास अजून वेळ लागला तर विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शिक्षकांकडून हे प्रामाणिक प्रयत्न.

निसर्ग वादळाच्या तडाख्याला शेकडो वर्ष जुना सुधागड किल्ला देखील उपवाद ठरू शकला नाही. किल्ल्यावरील भोराईदेवी मंदिर, पंतसचिव वाडा, काही मंदिरे, इत्यादी बऱ्याच वास्तूंचे छप्पर व भिंतीचे काही भाग वादळामुळे ढासळले गेले. सुधागड किल्ला तसेच त्यावरील मंदिरे / वास्तूंच्या देखरेखीची जबाबदारी असलेल्या भोर संस्थान विश्वस्त यांच्या मदतीच्या हाकेला सर्वांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. २००३ साल पासून दरवर्षी सातत्याने सुधागड किल्ल्यावर अनेक गडसंवर्धन उपक्रमांद्वारे राबता असलेली ट्रेकक्षितिज संस्था तरी कुठे मागे राहणार होती. वास्तूंच्या दुरुस्तीचे काम नवरात्रोत्सव आधी पूर्ण करता यावे, या करीता भोर संस्थान यांना जीर्णोद्धाराच्या या कामात ट्रेकक्षितिज संस्थेकडून देखील मदत कार्य करण्यात आले.

दरवर्षी भोर संस्थान विश्वस्त व सुधागड तालुक्यातील भाविक मंडळी, हे नवरात्री दरम्यान किल्ल्यावर भोराई देवीचा उत्सव साजरा करतात. यावर्षी कोरोना महामारीमुळे कार्यक्रम मोठ्या




**छप्पर व भिंत मोडलेली शाळा व घरं**

प्रमाणात  करता येणार नव्हते. मर्यादित संख्येत गावकरी व काही विश्वस्त हे कोविडचे नियम पाळून, परंपरे नुसार भोराई देवीची ९ दिवस विधिवत पूजा करतील असे सर्वानुमते ठरले. भोराई देवी मंदिर व पंत-सचिव वाड्यात दिव्याची सोय नसल्यामुळे संस्थेच्या वतीने किल्ल्यावरील भोराई देवी मंदिर करिता प्रत्येकी ३ सौर दिवे असलेले २ संच देण्यात आले. ट्रेकक्षितिज तर्फे सुहास जोशी, शार्दूल भोगले व राहुल मेश्राम हे मंदिरामध्ये सौर ऊर्जेचे उपकरण स्थापित करण्यासाठी किल्ल्यावर उपस्थित होते. त्यामुळे सुधागड किल्ल्याबरोबर संस्थेचे असलेले नाते अजून बळकट झाले एवढं नक्की.

ट्रेकक्षितिज संस्थेने सुधागड भागातील वादळग्रस्तांच्या मदत कार्याची जबादारी घेऊन त्या कार्यात अनेकांना सहभागी करून घेतले व सहकार्यही मिळवले. महिनाभर चाललेल्या या सामाजिक कार्यात अनेक सद्गृहस्थ, देणगीदार, संस्था, सेवाभावी मंडळ व सभासदांनी निस्वार्थपणे काम केले. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी स्वतःची सुधागडाशी असलेली बांधिलकी दाखवून दिली. वादळग्रस्त आदिवासी भागातील ह्या गरजू ग्रामस्थांसाठी संस्थेच्या वतीने खरीचा वाटा उचलता आला ह्यात समाधान वाटत आहे.

संस्थेला ह्या परिसरात अजून बरीच कामे करायची आहेत. सुधागड किल्ल्यावरील विविध वास्तूंच्या दुरुस्तीचे कार्य अजून चालूच आहे, पुढे देखील संस्थेकडून किल्ल्यावर मदत कर्तव्य अविरत चालू राहील. आदिवासी भागातील विद्यार्थींना शैक्षणिक साहित्याची खुप गरज आहे, पण घरच्या परीस्थिति मुळे पालक ईच्छा असून सुद्धा त्यांची ही गरज पूर्ण करू शकत नाहीत. सर्व विद्यार्थ्यांना पाठ्य-पुस्तके, वह्या व इतर शैक्षणिक साहित्ये शाळा सुरू होण्या आधी उपलब्ध करुन देण्यासाठी संस्था प्रयत्न करत आहे. तसेच विद्यार्थी व ग्रामस्थांसाठी वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन आणि मूलभूत कोरोना सेफ्टी किटचे वाटप भविष्यात संस्थेला करायचे आहे. शिक्षणामुळे या आदिवासी विद्यार्थ्यांना स्वतःची आर्थिक स्थिती सुधारण्यास नक्कीच मदत होईल. आपल्या सर्वांना हे माहित  आहे की कोरोना व नैसर्गिक आपत्तीच्या ह्या काळात, आपण केलेले योगदान आपल्या समाजातील या कमनशिबी सदस्यांच्या अस्तित्वाच्या धडपडीत मोठा फरक घडवू शकतो. तरी आपण मदतीचा हात पुढे करावा ही नम्र विनंती.

सुधागड परिसरातील वादळग्रस्त ग्रामस्थांना ट्रेकक्षितिज संस्थेच्या माध्यमातून ज्यांनी साहाय्य केलं, देणगी दिली, मार्गदर्शन केले, प्रत्यक्ष वेळ काढून धावून गेले अशा ज्ञात व अज्ञात सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद...



**निसर्ग चक्रीवादळामुळे भोराईदेवी मंदिर व पंतसचिव वाडयाचे झालेले नुकसान**



**छप्पर व भिंत मोडलेली शाळा व घरांना पत्रे व दरवाजे यांची मदत**



**अन्नधान्य किराणा व इतर जीवनावश्यक वस्तूंची ग्रामस्थांना मदत**



**भोराई देवी मंदिरात सौर दिव्यांच्या संचांची स्थापना**

# वाटचाल – ट्रेकक्षितिज संस्था

**– अमित सामंत**

महाविद्यालयात असताना चार डोकी एकत्र येतात, डोंगर भटकंती सुरु होते आणि त्यालाच ट्रेकींग ग्रुपचे स्वरूप मिळते अशीच काहीशी आपल्या संस्थांची कूळकथा असते. डोंबिवलीतील अशाच १३ जणांना प्रमोद जोशी सरांनी गड-किल्ल्यांची ओळख करुन दिली आणि त्यातूनच ‘स्वप्न दुर्गभ्रमणाचे, आव्हान क्षितिजाचे’ असे ध्येय बाळगून २७ फेब्रुवारी २००१ साली ट्रेकक्षितिज संस्थेची स्थापना झाली. ट्रेकक्षितिज संस्था एक सार्वजनिक विश्वस्त संस्था (NGO) आहे. (नोंदणी क्रमांक: महा/९८/०६/ ठाणे)

इंटरनेट युगातील या तरुणांनी केवळ भटकंती न करता गड-किल्ल्यांच्या नोंदी करायला सुरुवात केली, त्यादेखील वेबसाईटच्या माध्यमातून. त्यामुळेच २००१ साली www.trekshitiz.com ही किल्ल्यांची मराठीतून माहिती देणारी पहिली वेबसाईट सुरु झाली. आज या वेबसाईटवर तब्बल ३६३ किल्ल्यांची मराठीत व ३२९ किल्ल्यांची इंग्रजीत माहिती असून, सुमारे दहा हजार छायाचित्रे व २०० संगणकीय नकाशे उपलब्ध आहेत. डोंगरभटक्यांना एकत्र आणणारे विविध फोरम, अनेक डोंगर भटकंती करणाऱ्या संस्थांची माहिती, किल्ल्यांच्या पायथ्यावरील गावांच्या गाड्यांचे वेळापत्रक, अश्या अनेक गोष्टींचे भांडार या वेबसाईटच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिले आहे. गेल्या १८ वर्षात ही वेबसाईट तब्बल दोन करोड लोकांनी पाहीली आहे. २००५ साली संस्थेच्या ह्या वेबसाईटला उत्कृष्ट मराठी वेबसाईट म्हणुन महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विकास परिषदेचे तिसरे पारितोषिक मिळालेले आहे.

गड-किल्ल्यांची माहिती व आपल्या इतिहासाबाबत जागरुकता समाजात निर्माण व्हावी या ध्येयाने संस्थेने शिवोत्सव कार्यक्रम सुरू केला. २००३, २००४, २००९, २०१२ व २०१९ या वर्षांमध्ये संस्थेतर्फे शिवोत्सवचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यात शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन, रेखाचित्रांचे प्रदर्शन, किल्ल्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन, इतिहासतज्ज्ञांचे व्याख्याने असे स्तुत्य उपक्रम त्यात होते. २००४ साली दहा महत्त्वांच्या किल्ल्यांचे फायबर मॉडेल्सचे प्रदर्शन भरवून संस्थेने डोंबिवलीत जणू शिवसृष्टीच निर्माण केली होती.

२००४ साली सुधागड या पालीजवळील किल्ल्यावरील श्रमदानाने, या भटकंतीला गडसंवर्धनाची जोड मिळाली. संस्थेने गेल्या १५ वर्षात सुधागडवर अनेक उपक्रमांचा धडाकाच लावला आहे. महादरवाजातील माती सफाई, तटबंदी सफाई, वीरगळ सफाई, नियमित वृक्षारोपण, टाके सफाई या उपक्रमांतून सुधागडवर संस्थेच्या कार्यकर्त्यांचा कायम राबता असतो. केवळ गडावरच नाही तर पायथ्याच्या पाच्छापूर गावातील शाळेत अनेक उपक्रम राबविले जातात. शाळेत चालू केलेल्या वाचनालयात दोन हजारच्या वर पुस्तके आहेत. दरवर्षी १४ आणि १५ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांसाठी अनेक कार्यशाळा आणि स्पर्धा घेतल्या जातात. त्याच बरोबर वैद्यकीय तपासणी शिबिर, तज्ञांचे मार्गदर्शन, स्लाईड-शो असे विविध उपक्रम राबवले जातात. अनेक देणगीदारांनी दिलेल्या दानातून आजपर्यंत शाळेतील ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांना पाठ्य-पुस्तके, वह्या, शाळेसाठी कॉम्प्युटर, टेबल, कपाट, बेंचेस, शाळेचे फ़्लोरींग इत्यादी गोष्टी देण्यात आल्या आहेत.

ट्रेकक्षितिजने आजवर गड-किल्ले, इतिहास व निसर्ग या विषयांवर आधारित दोनशेहून अधिक स्लाईड-शो केले आहेत. दरवर्षी डोंबिवलीत होणार्या नववर्ष स्वागतयात्रे दरम्यान विविध विषयांवर आधारित छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित केले जाते. गड-किल्ले, लेणी, शस्त्रास्त्रे आणि मंदिरे यांची रेखाचित्रे व छायाचित्रे यांचा योग्य वापर करून आठ वर्षे संस्थेमार्फत दिनदर्शिका देखील काढल्या जात होत्या.

२०१२ पासून ट्रेकक्षितिज संस्था डोंबिवली-ठाकुर्ली परिसरात दिवाळी दरम्यान किल्ले बांधणी स्पर्धा आयोजित करते. त्याच बरोबर फडके रोड येथील श्री गणेश मंदिर परिसरात दरवर्षी संस्थेचे कार्यकर्ते प्रदर्शनासाठी किल्ल्याची प्रतिकृती बनवतात. स्पर्धेपूर्वी किल्ले बांधणीचे शिबिर घेउन मुलांमधे आणि पालकांमधे किल्ल्यांबद्दल तसेच पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे कार्य संस्था सातत्याने करत आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षात केवळ किल्ले बांधणीच्या कौशल्यातच वाढ न होता पर्यावरण आणि परिसराची स्वच्छता याबद्दल स्पर्धक सजग झालेले आढळून आले आहे.

सह्याद्री पर्वतरांगेत ३५० पेक्षा जास्त किल्ले आहेत. निसर्ग आणि मानवाकडुन होणारा त्याचा ऱ्हास आपण रोखु शकत



नाही. पण आज अस्तित्वात असलेल्या किल्ल्यांचे आणि वास्तुंचे जर आपण डॉक्युमेंटेशन केले तर पुढच्या पिढीसाठी तो एक अमुल्य ठेवा होईल. या भावनेतून ट्रेकक्षितिज संस्थेने नकाशातून दुर्गभ्रमंती हे १२५ किल्ल्यांच्या अद्ययावत नकाशांचे पुस्तक संस्थेचे सभासद श्री. महेंद्र गोवेकर ह्यांच्या मदतीने तयार केले. या पुस्तकाला २०१४ साली पुणे मराठी ग्रंथालयाचा ना. ह. आपटे पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. २०१९ मध्ये या पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती Forts Through Maps प्रकाशित करण्यात आली आहे. या पुस्तकात १५० किल्ल्यांचे अद्ययावत नकाशे आहेत.

२०१७ मध्ये संस्थेचे सभासद श्री. प्रसाद निकते ह्यांच्या महत्वाकांक्षी Walking on the Edge ह्या ७५ दिवसात ७५० KM संपूर्ण सह्याद्री डोंगर रांगेच्या धारेवरून पदभ्रमण मोहिमेचे आयोजन संस्थेने केले होते.

देशातील दुर्गप्रेमी / गिर्यारोहकांचा सर्वात मोठा वार्षिक मेळावा म्हणजेच गिरिमित्र संमेलनाच्या आयोजनामध्ये ट्रेकक्षितिज संस्थेचा नेहमीच सक्रिय सहभाग असतो. २०१४ साली झालेल्या १३ व्या गिरिमित्र संमेलनात गिर्यारोहण आणि सामाजिक क्षेत्रातील योगदाना बद्दल ट्रेकक्षितिज संस्थेचा गिरिमित्र गिर्यारोहण संस्था सन्मान हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

श्रीशिवराज्याभिषेकदिनोत्सव सेवा समिति, दुर्गराज रायगड संस्थे तर्फे गड-किल्ले माहिती संकलन व संवर्धन कार्या करीता २०१८ साली ट्रेकक्षितिज संस्थेचा सन्मान करण्यात आला. दुर्ग संवर्धन, दुर्ग भ्रमण आणि निसर्ग संवर्धन या क्षेत्रातील योगदाना बद्दल ट्रेकक्षितिज संस्थेला २०१९ साली स्वराज्य सोशल वेलफेयर ऑर्गनायझेशन तर्फे स्वराज्य भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.


२०१८ साल पासून ट्रेकक्षितिज संस्थेने ३ दिवसांच्या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यास सुरुवात केली आहे. इतिहास, गड-किल्ले, इत्यादी विषयातील तज्ञांची व्याख्याने डोंबिवलीकरांसाठी विनामुल्य आयोजित केली जातात.

गड-किल्ल्यांबद्दल जनजागृती निर्माण व्हावी यासाठी ट्रेकक्षितिज संस्थे तर्फे दर महिन्याच्या दुसर्या आणि चौथ्या शनिवारी/रविवारी दुर्गभ्रमण मोहिमा (ट्रेक्स) आयोजित केल्या जातात. डोंबिवली ते डोंबिवली असलेल्या या दुर्गभ्रमण मोहिमांदरम्यान किल्ल्यांची व त्याच्या इतिहासाची संपूर्ण माहिती दिली जाते. वर्षातून काही ट्रेक्स इतिहासतज्ञ, निसर्गतज्ञ यांच्या बरोबर आयोजित केले जातात, जेणे करुन त्या विषयाची संपूर्ण माहिती आणि तज्ञांशी संवाद साधण्याची संधी सहभागी भटक्यांना उपलब्ध होते.

महाविद्यालयात सुरू झालेले ट्रेकींग ग्रुप ४ - ५ वर्षे एकत्र भटकंती करतात आणि थांबतात असे काहीसे चित्र असण्याच्या आताच्या काळात ट्रेकक्षितिज मधील जून्या - नव्या फळीने संस्थेची वाटचाल जोमाने पुढे सुरू ठेवली आहे.




शिवोत्सव २००४




शिवोत्सव २०१२ (व्याख्यानमाला)




सुधागड - महादरवाजा माती सफाई




सुधागड - वाचनालय व
पाठ्य-पुस्तके, वह्या वाटप





स्लाईड-शो




किल्लाची प्रतिकृती




पुस्तक प्रकाशन




सह्याद्री डोंगर रांगेच्या धारेवरून पदभ्रमण



गिरिमित्र गिर्यारोहण संस्था सन्मान



दुर्गभ्रमणाच्या पदभ्रमण मोहिमा (ट्रेक्स)



रॅपलिंग प्रशिक्षण



गुढीपाडवा - छायाचित्र प्रदर्शन

# श्रेय नामावली

**संकल्पना व मुख्य समन्वयक –** शार्दूल भोगले
**अंक सजावट आणि मांडणी –** महेंद्र गोवेकर
**लेख परीक्षण –** अमित सामंत
**ई–मॅगझीन लोगो –** पराग दाबके
**मुखपृष्ठ (छायाचित्र) –** अभिलाष होले
**मुखपृष्ठ रचना –** प्राजक्ता मालवणकर

**क्षितिजन्स टीम :–**

अमित सामंत
अमित दीक्षित
अमोल पोवळे
अलोक गोरे
अरुणा लागू
अश्विनी पितळे
अक्षय कुलकर्णी
आदित्य गोरे
उमेश करवल
कौस्तुभ सामंत
गुंजन चौघुले
चेतना गावंड
दिवाकर भाटवडेकर
दीपाली सबनीस
ध्रुमन उतेकर
निनाद विलणकर
नंदू देवधर
प्राजक्ता महाजन
प्राजक्ता मालवणकर
प्रिया कराडकर
महेंद्र गोवेकर
राहुल मेश्राम
रोहित राजोळे
विनोद नाडर
विराज टिल्लू
शार्दूल भोगले
शिवानी चव्हाण
सारिका धुरी
सुमती देसाई
सुहास जोशी
स्वप्नाली सोनावणे
हर्षल महाजन
हिमांशू टिल्लू
श्रेयस पेठे

**संपादकीय विभाग पत्रव्यवहार –**
ट्रेकक्षितिज संस्था, फ्लॅट क्रमांक – १३, रुक्मिणी सोसायटी,
मानपाडा रोड, गोदरेज शोरूम समोर, डोंबिवली (पूर्व). ४२१ २०१.

**ई–मेल –** trekshitiz.ac@gmail.com

**वेबसाईट –** www.trekshitiz.com

**‘क्षितिजियन्स’ मध्ये प्रकाशित होणाऱ्या लेखातील विचार, प्रतिपादन, भाष्य, टीका याच्याशी संपादक व प्रकाशक (संस्था) सहमत असतातच असे नाही.**

**(हे मासिक केवळ संस्थांतर्गत वितरणासाठी आहे. © ट्रेकक्षितिजच्या पूर्वपरवानगी शिवाय या अंकातील लेख आणि छायाचित्रे पूर्णपणे किंवा अंशतः वापरता येणार नाहीत.)**


ट्रेक क्षितिज संस्था
स्वप्न दुर्गभ्रमणाचे, आव्हान क्षितिजाचे.
www.TreKshitiZ.com
धन्यवाद!